cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२१९ | शनिवार दि.०६ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सरकारची 'संचार साथी' हुकूमशाही वृत्तीचीच

प्रत्येक मोबाईलमध्ये 'संचार साथी'ॲप बसविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला होता. या निर्णयाला मोठा विरोध झाल्याने तो मागे घेण्यात आल्याचे दिसते. या ॲपच्या माध्यमातून हेरगिरी करण्याचा केंद्र सरकारचा कोणताही हेतू नव्हता. तसेच या ॲपमुळे हेरगिरी होण्याची शक्यताही नाही. तरीही या ॲपसंबंधी सक्ती न करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे




## थोडक्यात...

### संचार साथी ॲप बनले 'डाउनलोड चॅम्पियन'..!

नवी दिल्ली : केंद्र सरकारने सर्व मोबाईल फोन्समध्ये संचार साथी ॲप प्री-इंस्टॉल करण्याचा आदेश मागे घेतल्याचा एक अविश्वसनीय परिणाम समोर आला आहे. ज्या ॲपला आतापर्यंत फारसं महत्त्व दिलं जात नव्हतं, तेच ॲप अचानक देशभरात चर्चेचा विषय बनून डाउनलोडच्या बाबतीत विक्रमवीर ठरले आहे. संचार साथी ॲप अनिवार्यपणे इन्स्टॉल करण्याच्या सरकारच्या निर्देशाला विरोधी पक्षांकडून, मोबाईल कंपन्यांकडून आणि नागरिक समाजाकडून तीव्र विरोध झाला. गोपनीयता आणि सक्तीच्या ॲप इन्स्टॉलेशनच्या धोक्यांवरून जोरदार चर्चा सुरू झाली. याच वादामुळे लोकांनी उत्सुकतेपोटी या ॲपकडे लक्ष वेधले आणि त्याचे डाउनलोड मोठ्या प्रमाणात वाढले.

### इंडिगोच्या संकटादरम्यान विमान प्रवासाचे दर महागले

मुंबईः इंडिगोच्या मोठ्या प्रमाणात उड्डाणे रद्द झाल्यामुळे, देशातील इतर सर्व प्रमुख विमान कंपन्यांच्या देशांतर्गत विमान प्रवासाच्या किमती शुक्रवारी गगनाला भिडल्या. शुक्रवारी एअर इंडियाच्या दिल्ली ते बेंगळुरू या एक थांबाच्या तिकिटाची किंमत १.०२ लाखांवर पोहोचली, तर अकासा एअरच्या त्याच मार्गाच्या तिकिटाची किंमत ३९,००० होती. एअर इंडियाच्या दिल्ली-मुंबई तिकिटाची किंमत ६०,००० वर पोहोचली, तर एअर इंडिया एक्सप्रेसच्या चेन्नई-दिल्ली तिकिटाची किंमत ४१,००० आणि स्पाइसजेटच्या तिकिटाची किंमत ६९,००० वर पोहोचली. हैदराबादहून येणाऱ्या विमान प्रवासाच्या किमतीही गगनाला भिडल्या आहेत. हैदराबाद-दिल्ली मार्गावरील एअर इंडियाच्या एक-थांब्याच्या तिकिटाची किंमत ८७,००० वर पोहोचली आहे. दरम्यान, हैदराबाद-मुंबई मार्गावरील एअर इंडियाच्या तिकिटाची किंमत ४१,००० पेक्षा जास्त झाली आहे आणि एअर इंडिया एक्सप्रेसच्या तिकिटाची किंमत ३६,१०० पर्यंत वाढली आहे.

### अर्थव्यवस्थेसाठी अखंड इंधन पुरवठा-राष्ट्रपती पुतिन

दिल्लीःरशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारत दौऱ्यावर आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी, राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी व्यापारासह विविध मुद्द्यांवर चर्चा केली. भारत आणि रशियामध्ये अनेक करार झाले. भारत आणि युरेशियन इकॉनॉमिक युनियनमधील मुक्त व्यापार करारामुळे मदत होईल. आम्ही हळूहळू पेमेंट सेटलमेंटसाठी राष्ट्रीय चलनांचा वापर करण्याकडे वाटचाल करत आहोत. व्यावसायिक पेमेंटमध्ये हा वाटा आधीच ९६% आहे. आम्हाला ऊर्जा क्षेत्रात यशस्वी भागीदारी देखील दिसत आहे तेल, वायू, कोळसा आणि भारताच्या ऊर्जेच्या गरजांसाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व गोष्टींचा शाश्वत पुरवठा, असेल असे पुतिन म्हणाले.

### लग्नाचे वय नसले तरी लिव्ह-इनमध्ये राहता येणार

जयपूर : लग्नाचे वय पूर्ण झाले नसले तरी दोन प्रौढ व्यक्तींना परस्पर संमतीने लिव-इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचा पूर्ण अधिकार आहे असा ऐतिहासिक निर्णय राजस्थान हायकोर्टाने दिला आहे. भारतात महिलांसाठी विवाहयोग्य वय १८ वर्षे आणि पुरुषांसाठी २१ वर्षे असले, तरी १८ वर्षांपासून व्यक्तीला कायद्यानुसार प्रौढ मानले जाते. न्यायमूर्ती अनुप ढांड यांनी हा निकाल दिला आहे. हा निर्णय कोटा येथील १८ वर्षीय तरुणी आणि १९ वर्षीय युवकाने दाखल केलेल्या संरक्षण याचिकेच्या संदर्भात देण्यात आला. दोघांनीही हायकोर्टात अर्ज करताना सांगितले की, त्यांनी परस्पर संमतीने लिव-इन रिलेशनशिप स्वीकारली आहे आणि त्यांच्या जीवाला धोका असल्याने पोलिस संरक्षणाची गरज आहे.

### डॉलरच्या तुलनेत रुपयाची नीचांकी घसरण

नवी दिल्ली : चालू वर्षात तब्बल ५ टक्के घसरणीसह रुपयाची डॉलरच्या तुलनेत विक्रमी घसरण सुरूच आहे. आजही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत रुपया डॉलरच्या तुलनेत अक्षरश: धारातीर्थी पडला. त्यामुळे आज रुपयाची नीचांकी ९०.४३ एवढा नोंदला गेला. काल रुपया ९०.१५ वर बंद झाला होता. रुपयाची अभूतपूर्व घसरण झाल्याने अर्थव्यवस्थेला मोठा झटका बसला. डॉलरच्या तुलनेत रुपयाची नीचांकी घसरण झाल्याने भारताचा आयातीवरील खर्च वाढणार असून इंधन खरेदीला फटका बसणार आहे. इतकेच नव्हे तर कंपन्यांना लागणारा कच्चा माल, सुटे घटक, धातू आणि रसायनाच्या किंमतीही वाढणार आहेत. उत्पादित वस्तूंच्या किंमती वाढणार आहेत. सततच्या परदेशी निधीच्या बाहेर जाण्यामुळे रुपयावर दबाव निर्माण झाला आहे.

# उसाच्या पैशातून शेतकऱ्यांचे कर्ज कपात करू नका

# राज्यात सीसीआयने कापूस खरेदीची मर्यादा वाढवावी

पुणे । प्रतिनिधी

**साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचे कोणतेही कर्ज ऊसाच्या पैशातून, विशेषतः पहिल्या हप्त्यातून कापू नये. अशी मागणी शुक्रवारी किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केली आहे. तर कापूस खरेदीसाठी सीसीआयने (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) ठरवलेली ५ क्विंटल ६० किलो प्रतिएकर मर्यादा रद्द करून, ती १५ क्विंटलपर्यंत वाढवावी,अशी मागणी शिवसेना (ठाकरे गट) यांनी केली आहे. शासनाने शेतकरी हितासाठी हे निर्णय घेण्याची अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.**





किसान सभेने प्रसिद्धिपत्रकातून असेही नमूद केले आहे की, राज्यात ऊस गाळप हंगाम सुरू आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना उसाचे पहिले बिल आणि योग्य दर मिळावा, या मागणीसाठी राज्यभर आंदोलन सुरु आहेत. या आंदोलनामुळे लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात पहिली उचल जमा होण्याची शक्यता किसान सभेने व्यक्त केली आहे. शेतकरी कर्जमाफीवरुन किसान सभेने भुमिका स्पष्ट केली आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून २०२६ पर्यंत शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ केले जाईल. पण गेले काही वर्षांचे अनुभव पाहता, कर्जमाफी मुख्यत्वे ज्या शेतकऱ्यांचे कर्ज थकलेले असते, त्यालाच मिळते. असा दावाही प्रसिद्धिपत्रकात केला आहे. दरम्यान, काही बँका कारखान्यांशी थेट संपर्क करून शेतकऱ्यांचे कर्ज उसाच्या बिलातून कापून ▶▶ पान २ वर

# मतमोजणी लवकर करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

## कितीही याचिका आल्या तरी निवडणूक कार्यक्रम ठरल्या वेळेतच

दिल्ली । वृत्तसंस्था

नागपूर खंडपीठाने नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांचे निकाल हे एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे आदेश दिले होते. उच्च न्यायालयाच्या या निकालाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती. याबाबत शुक्रवारी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयानं नगरपालिका आणि नगरपरिषदांचे निवडणूक निकाल लवकर जाहीर करण्यास नकार दिला



आहे. त्यामुळे आता पुढे ढकलण्यात आलेल्या नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणूक मतदान २० डिसेंबर आणि सर्व नगरपालिका नगरपरिषदांची एकत्रित मतमोजणी ही २१ डिसेंबर रोजी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीवेळी कोणत्याही निवडणुका प्रलंबित राहू नये. उच्च न्यायालयाने ३१ जानेवारी या मूळ मुदतीच्या आता सर्व निवडणुका होतील हे पहावे असे देखील म्हटले आहे. याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाने २० तारखेला मतदान होणाऱ्या नगरपालिका ▶▶ पान २ वर

# शिर्डीला निघालेल्या भाविकांना गेवराईजवळ मध्यरात्री लुटले

## ट्रकचालकाने काढलेल्या व्हिडिओतून थरारक प्रसंग व्हायरल



बीड । प्रतिनिधी

**तेलंगणातून बीडमार्गे शिर्डीला देव दर्शनासाठी निघालेल्या भाविकांना बीड जिल्ह्यातील गेवराईजवळ मध्यरात्री भररस्त्यात अडवून त्यांची लूट करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा प्रकार एका ट्रक चालकाने त्याच्या मोबाईलमध्ये कैद केला असून, तो मोठ्या व्हायरल होताना दिसत आहे.**

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशांना शस्त्राचा धाक दाखवून लुटल्याचे प्रकार सातत्याने समोर येत आहेत. एका ट्रक चालकाने असाच लूटण्याचा प्रकार आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला आहे. चोरट्यांच्या हाती शस्त्र असल्याने त्यांना रोखण्याची हिंमत ना प्रवासी भाविकांची झाली, ना माझी झाली, असेही ट्रक चालकाने स्वत: बनवलेल्या एका व्हिडिओतून सांगितले आहे. तेलंगणा येथील शिवप्रसाद पौने आपल्या कुटुंबासह खासगी वाहनाने शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी जात होते. दरम्यान, बीडमार्गे प्रवास करत असताना त्यांचे वाहन गेवराई जवळील गढी येथे थांबले असता चोरट्यांनी अचानक त्यांच्या गाडीवर हल्ला केला. यावेळी लोखंडी रॉडसह अन्य हत्याराने पौने कुटुंबाला धाक दाखवून महिलांच्या गळ्यातील ▶▶ पान २ वर

# सरकारी कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे कामे बंधनकारक



नवी दिल्ली । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि इतर राज्यांमध्ये मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण(एसआयआर) ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करत आहे. न्यायालयाने म्हटले की, राज्य सरकारांनी किंवा ▶▶ पान २ वर

# वृक्षतोडीवरुन दोन्ही शिवसेनेचे एकमत!

## शिंदेंची सेना तपोवनात, ठाकरेंच्या खासदाराचा आवाज दिल्लीच्या संसद भवनात

पुणे । प्रतिनिधी

यंदाच्या कुंभमेळ्यासाठी नाशिकच्या तपोवन परिसरातील अंदाजे १८०० झाडांच्या कत्तलीच्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या संतापाची दखल आता थेट देशाच्या संसदेत घेतली जात आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी शुक्रवारी लोकसभेत शून्य प्रहरात तपोवन झाडतोडीचा मुद्दा जोरदारपणे मांडला. याआधी त्यांनी मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांना पत्र लिहून झाडतोड तात्काळ थांबवण्याची मागणी केली होती. दुसरीकडे शिंदे शिवसेनेकडूनही



तपोवन कायम राखण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसत आहे. एरव्ही राज्यातील प्रत्येक मुद्यांवरून एकमेका विरोधात भुमिका घेण्याचा शिंदे आणि ठाकरे गटाचा इतिहास ▶▶ पान २ वर

# ईडीकडून ११ वर्षात तब्बल ६३०० केस दाखल

नवी दिल्ली । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या वतीने संसदेत एक आकडेवारी सादर केली आहे. या आकडेवारीनुसार २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नॅशनल डेमोक्रेटिक अलायन्सचे सरकार आल्यानंतर विरोधी पक्षाच्या लोकांवर ईडी अंतर्गत कारवाईला वेग आल्याने टीका केली जात होती. इन्फोर्समेंट डायरेक्टरेट म्हणजेच सक्तवसुली संचालनालयाने अकरा वर्षांत ६ हजार ३१२ लोकांवर केस



रजिस्टर केल्या आहेत. मात्र त्यातील कमी प्रकरणे प्रत्यक्षात शिक्षेपर्यंत पोहचली आहे.

सध्या संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात सरकारने दाखल केलेल्या एका आकडेवारीने सर्वांचेच लक्ष वेधले आहे. गेल्या ११ वर्षात नरेंद्र मोदी यांच्या एनडीए सरकार आल्यानंतर ६,३१३ लोकांवर प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंड्री एक्ट गुन्हा दाखल झाला. परंतू यात आतापर्यंत १२० लोकांना प्रिव्हेन्शन ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी; खात्यात येणार ३००० रुपये?

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाखो लाभार्थ्यांसाठी वर्षाअखेरीस मोठी भेट मिळण्याची शक्यता आहे. डिसेंबर महिन्यात १५०० नाही, तर थेट ३००० सन्माननिधी जमा होण्याची शक्यता आहे.

नोव्हेंबर महिन्याचा हप्ता अजून जमा न झाल्याने, सरकार नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन्ही महिन्यांचे दोन हप्ते एकत्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची शक्यता आहे, अशी चर्चा सध्या माध्यमांमध्ये रंगली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमुळे ही रक्कम जमा होण्यास विलंब झाला असावा, असा अंदाज वर्तवला जात आहे. यापूर्वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वेळीही लाभार्थ्यांच्या खात्यात एकाच वेळी दोन महिन्यांची रक्कम जमा करण्यात आली होती. सूत्रांनुसार, पुढील आठवड्यात सरकार लाडक्या ▶▶ पान २ वर

# 'मंदिराचा पैसा देवाचा, बँका वाचवण्यासाठी नाही'; सुप्रीम कोर्टने सुनावले सहकारी बँकांना सुनावले

नवी दिल्ली। वृतसंस्था

मंदिराला दान मिळालेले पैसे हे देवाचे असतात आणि त्यांचा वापर सहकारी बँकेला वाचवण्यासाठी किंवा समृद्ध करण्यासाठी केला जाऊ शकत नाही अशी टिप्पणी एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केली. केरळ उच्च न्यायालयाने थिरुनेली मंदिर देवस्वोमला त्यांच्या ठेवी परत करण्याचे आदेश दोन सहकारी बँकांना दिले आहेत.

त्याला आव्हान देणाऱ्या बँकांनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने सुनावणी केली. सुनावणीदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशात काय चूक आहे अशी विचारणाही यावेळी केली.

तुम्हाला बँक वाचवण्यासाठी मंदिरातील पैसे वापरायचे आहेत. मंदिरातील पैसे सहकारी बँकेत राहण्याऐवजी जास्त ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०५ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५८.०० क्विंटल | २,३९० | ३,१४० | २,७९४ |
| ज्वारी/हायब्रिड : ३८.५० क्विंटल | १,९२१ | ३,११० | २,७०२ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद :१८.०० क्विंटल | ३,५०० | ५,१६० | ४,६१५ |
| बाजरी: १४.५० क्विंटल | २,७०२ | ५,५२१ | ३,२५४ |
| मुग: १.५० क्विंटल | ५,५०० | ५,८५० | ५,६७५ |
| सोयाबीन: १७५.५० क्विंटल | ३,६०० | ४,५५० | ४,३६४ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |

# आयोगाने संवैधानिक शिस्त पाळली नाही!

## खंडपीठाने निवडणूक आयोगाला फटकारले

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांच्या निकालाची तारीख अचानक पुढे ढकलण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले. तत्पूर्वी निवडणूक आयोगाने ७२ तासांच्या आधी २४ नगराध्यक्ष आणि १५० पेक्षा जास्त नगरसेवक प्रभागातील निवडणुका पुढे ढकलल्या. या पार्श्वभूमीवर नागपूर खंडपीठीने एकाच निवडणुकीच्या निकालाच्या दोन तारखा मान्य नसल्याचे निदर्शनास आणून देत २१ डिसेंबर रोजी निकाल ठेवला. त्यानंतर आता औरंगाबाद खंडपीठाने निवडणूक आयोगाने कॅलेंडर पाळायला हवे होते. यातून आयोगाने प्रशासकीय दूरदृष्टीच्या अभावाचे प्रदर्शन केले. त्यांनी संवैधानिक शिस्त पाळली नाही, असे गंभीर निरीक्षण नोंदवले.**



### गाईडलाईन्स तयार करा

लोकशाहीत निवडणुकीच्या वेळापत्रकाचे पावित्र्य राखणे हे मूलभूत कर्तव्य आहे. निवडणुका लांबणीवर टाकायच्या असतील, तर त्याला भक्कम आधार असणे गरजेचे आहे आणि तसा निर्णय घ्यायचाच असेल तर तो आधी व्हायला हवा, असेही निरीक्षण हायकोर्टाने नोंदवले. तसेच भविष्यात असे प्रकार होऊ नयेत, म्हणून १० आठवड्यात यासंबंधीच्या गाईडलाईन्स तयार करण्याचे आदेशही हायकोर्टाने आयोगाला दिले.

उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चांगलेच झापले. नगरपालिका ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# सरकारची ‘संचार साथी’ हुकूमशाही वृत्तीचीच

प्रत्येक मोबाईलमध्ये ‘संचार साथी’ॲप बसविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला होता. या निर्णयाला मोठा विरोध झाल्याने तो मागे घेण्यात आल्याचे दिसते. या ॲपच्या माध्यमातून हेरगिरी करण्याचा केंद्र सरकारचा कोणताही हेतू नव्हता. तसेच या ॲपमुळे हेरगिरी होण्याची शक्यताही नाही. तरीही या ॲपसंबंधी सक्ती न करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे, अशी माहिती दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली. मोबाईल सुरक्षेसाठी या ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. ज्यांना ते हवे असेल ते आपल्या मोबाईलमध्ये इन्स्टॉल करून घेऊ शकतात. मात्र, इन्स्टॉलबाबतची सक्ती मागे घेण्यात आली आहे. लोकांचा मोबाईल सुरक्षित रहावा, तो चोरीला गेल्यास अथवा हरवल्यास त्याचा माग काढणे सोपे जावे, तसेच स्पॅम कॉल्स आणि मोबाईलचा दुरुपयोग करून होणाऱ्या आर्थिक घोटाळ्यावर नियंत्रण असावे यासाठी हे ॲप आणण्यात आले आहे. मात्र, त्याची सक्ती केली जाणार नाही. तसेच प्रत्येक मोबाईलमध्ये ते मोबाईलच्या विक्रीआधीच बसविण्याची सक्तीही करण्यात येणार नाही, अशी माहिती सरकारच्या वतीने देण्यात आली आहे.

सर्व मोबाईल्स आणि स्मार्टफोन्समध्ये त्यांची विक्री होण्यापूर्वीच ‘संचार साथी’ हे ॲप बसविण्यात यावे, असा आदेश केंद्र सरकारने मोबाईल सुरक्षा आणि सायबर सुरक्षा नियमाच्या अंतर्गत २८ नोव्हेंबर २०२५ रोजी काढला होता. या ॲपची निर्मिती केंद्र सरकारकडून करण्यात आली आहे. या ॲपमुळे नागरिकांवर हेरगिरी होण्याची शक्यता आहे, असा आरोप विरोधी पक्षांनी केला होता. संचार साथी ॲप संबंधीचा वाद २८ नोव्हेंबर रोजी सुरू झाला. दूरसंचार विभागाने सर्व मोबाईल फोन उत्पादकांना एक आदेश जारी केला, त्यामध्ये कंपन्यांना भारतात विकल्या जाणाऱ्या सर्व नवीन मोबाईल फोनवर तसेच विद्यमान हॅंडसेटवर सॉफ्टवेअर अपडेटद्वारे ॲप इन्स्टॉल करणे बंधनकारक करण्यात आले होते. ‘संचार साथी’ ॲपला होत असलेल्या तीव्र विरोधामुळे बुधवारी केंद्र सरकारने मोबाईल फोन उत्पादकांना केलेली ॲपच्या समावेशाची सक्ती मागे घेतली. संचार साथी ॲपच्या सक्तीच्या आदेशावर काँग्रेसने टीका केली. या ॲपची सक्ती पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याच डोक्यातील नवी कल्पना आहे. गुजरातमध्ये सत्तेत असल्यापासून खासगी लोकांवर पाळत ठेवण्याचा त्यांचा इतिहास आहे. आता ते देशातील प्रत्येक नागरिकावर पाळत ठेवू इच्छितात. खरा उद्देश लोकांचे सर्व व्यवहार ट्रॅक करणे हाच आहे. ते किती खर्च करतात, कोणाशी बोलतात, कोणती छायाचित्रे काढतात यावर पाळत ठेवली जाईल, अशी टीका काँग्रेसने केली. त्याआधी मंगळवारी काँग्रेस खासदार रेणुका चौधरी यांनी राज्यसभेत स्थगन प्रस्ताव मांडला होता पण त्यावर चर्चा होऊ शकली नाही. काँग्रेस खासदार प्रियंका गांधी म्हणाल्या की, हे पाऊल लोकांच्या गोपनीयतेवर थेट हल्ला आहे. हे हेरगिरी करणारे ॲप आहे. सरकार प्रत्येक नागरिकावर लक्ष ठेवू इच्छिते. सायबर फसवणूक रोखण्यासाठी एक यंत्रणा आवश्यक असली तरी हा सरकारी आदेश लोकांच्या वैयक्तिक जीवनात अनावश्यक घुसखोरी आहे. २८ नोव्हेंबरच्या आदेशात केंद्र सरकारने मोबाईल फोन उत्पादकांना सायबर सुरक्षा ॲप प्री-इन्स्टॉल केलेले स्मार्टफोन विकण्याचे निर्देश दिले होते. संचार साथी ॲप व्यवस्थेच्या आधारे आतापर्यंत हरवलेल्या आणि चोरीला गेलेल्या सात लाख मोबाईल्सचा शोध घेतला गेला आहे.

पैकी ५० हजार मोबाईल्स ऑक्टोबर महिन्यात शोधले गेले आहेत असे सांगण्यात आले. विनाकारण वाद नको आणि सरकारच्या हेतूविषयी शंका घेण्यास जागा राहू नये म्हणून सरकारने माघार घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. संचार साथी ॲप हे पेगॅसस स्पायवेअरचे आणखी एक रूप आहे आणि भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार लोकांची हेरगिरी करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. लोकांवर पाळत ठेवण्याऐवजी, सरकारने एप्रिलमध्ये पहलगाम हल्ला कसा झाला, दहशतवादी भारतात कसे घुसतात यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे ठाकरे म्हणाले. खरे तर आपण जेव्हा स्मार्ट फोन वापरण्यास सुरुवात केली तेव्हाच खासगीपणा, गोपनीयता गमावली होती. तेव्हा आता संचार साथी आणखी वेगळे ते काय करणार? हे ॲप नसतानासुद्धा हरवलेले मोबाईल काही प्रमाणात मिळत होतेच की, आर्थिक घोटाळ्यापासून बचाव करण्यासाठीच बँकांनी ग्राहकांना ‘केवायसी’ करण्यास भाग पाडले. परंतु सायबर घोटाळे होतच राहिले. उलट ‘ऑनलाईन केवायसी’च्या नादात अनेक बँक ग्राहक ‘ओटीपी’ देऊन फसले. संचार साथी ॲप दोन वर्षांपासून प्ले स्टोअर, ॲप स्टोअरवर उपलब्ध आहे. सुमारे पाच कोटी लोकांनी हे ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड केल्याचे सरकार सांगते. म्हणजे ज्यांना ‘संचार साथी’चे महत्त्व पटले आहे ते स्वेच्छेने हे ॲप डाऊनलोड करतच आहेत, मग सक्ती कशासाठी? सक्ती केली की संशयाला जागा मिळते. जर या ॲपमध्ये नागरिकांवर पाळत ठेवण्यासारखे काही असेल तर विरोधी पक्षांनी ते सिद्ध करावे आणि नसेल तर सत्ताधाऱ्यांनी ते सिद्ध करावे. म्हणजे संशयाला जागा राहणार नाही. पूर्व परवानगी न घेता सरकार फोनमध्ये शिरकाव करू पाहत असेल तर सायबर चोरांची आणि सरकारची भूमिका एकसारखीच आहे असे म्हणावे लागेल. जर्मनी, रशिया, चीन या देशांत सरकार जनतेवर जशी पाळत ठेवते तसाच काहीसा प्रकार भारतात सुरू आहे. कोरोना काळात ‘आरोग्य सेतू ॲप’ बंधनकारक करण्यात आले होते. सरकारची ही कार्यपद्धती हुकूमशाहीवृत्तीचीच म्हणावी लागेल.

२०२२ मध्ये या ॲपच्या कथित वापरामुळे मोठे राजकीय वादळ निर्माण झाले होते. संचार साथी ॲपद्वारा राजकीय विरोधकांवरच नव्हे तर देशातील प्रत्येक नागरिकावर पाळत ठेवली जाऊ शकते, हेरगिरी केली जाऊ शकते अशी भीती विरोधकांकडून व्यक्त केली जात आहे. डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे महत्त्व वाढले आहे. डिजिटल फसवणुकीपासून संरक्षणाच्या नावाखाली आलेल्या ‘संचार साथी’च्या सक्तीमुळे गोपनीयतेवरील धोक्यांचे प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे पुढे आले आहेत. डिजिटल फसवणूक आणि अन्य सायबर गुन्ह्यांपासून लोकांना वाचवण्यासाठी असे आदेश जारी करण्याऐवजी तंत्रज्ञान व त्याच्या वापराबद्दल देशव्यापी व्यापक प्रशिक्षण आणि जागरूकता मोहीम सुरू करायला हवी.

## कै.रामदास दशरथ यमपुरे यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त बबन महाराज मंझेरीकर यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

**उदंड वडगाव (शिवाजीनगर), ता. बीड येथे कै. रामदास दशरथ यमपुरे यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त विशेष धार्मिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. ०६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत प्रसिद्ध किर्तनकार बबन महाराज मंझेरीकर यांच्या कीर्तनाने परिसर भक्तिभावाने निनादणार आहे.**

कै. रामदास दशरथ यमपुरे हे आपल्या सुस्वभाव, सामाजिक बांधिलकी आणि लोकसंग्रहासाठी ओळखले जात. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी पुण्यतिथीचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त ग्रामस्थांसाठी आध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करणारा कार्यक्रम सज्ज करण्यात आला आहे. कार्यक्रमात बबन महाराज मंझेरीकर जीवनमूल्ये, सदाचार, भक्तीभाव आणि सामाजिक एकात्मता यांवर आधारित कीर्तन सादर करणार आहेत. या कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील एकोपा, नैतिकता आणि मानवतेचे संदेश दिले जाणार असून ग्रामस्थांत मोठी उत्सुकता आहे. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असून परिसरात स्वच्छता, मंडप व्यवस्था, आसन व्यवस्था तसेच ध्वनी विस्तार यंत्रणा यांची विशेष तयारी करण्यात आली आहे. ग्रामस्थ आणि यमपुरे परिवारातील सदस्य स्वयंसेवेच्या भावनेने कार्यरत आहेत. कै. रामदास यमपुरे



यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित हा सोहळा सामाजिक एकजुटीचे, आध्यात्मिक जाणीवेचे आणि कुटुंबीयांच्या आदरभावाचे प्रतिक ठरणार आहे. या कीर्तन कार्यक्रमास गावातील नागरिकांसह आसपासच्या परिसरातील भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शहाजी रामदास यमपुरे, धनंजय रामदास यमपुरे, चंद्रकांत रामदास यमपुरे तसेच संपूर्ण यमपुरे परिवार यांनी केले आहे.

## सांची बुद्ध विहारात मार्गशीर्ष पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

बौद्ध धम्मात पौर्णिमांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे.तथागतांच्या जीवनातील महत्वाच्या घटणा प्रत्येक पौर्णीमांचे महत्व सांगतात मार्गशीर्ष पौर्णिमेस तथागतांनी उन्मत्त अशा नालागिरी हत्तीस आपल्या मैत्री बलाने शांत केले होते. तसेच या पौर्णिमेस सम्राट अशोका ची मुलगी संघमित्रा बोधीवृक्षाची शाखा घेऊन श्रीलंकेत दाखल झाली होती. या घटनांचे स्मरण म्हणून आजची मार्गशीर्ष पौर्णिमा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस तथागत बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले. नंतर सामुहिक वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हा अध्यक्षा कमलताई डोंगरे,जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे,जिल्हा पर्यटन सचिव एन बी राजभोज यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे ता अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होत तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे यांनी केले तसेच या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार कोषाध्यक्ष डी एस साळवे यांनी मानले या प्रसंगी शेलापुरीच्या उपसरपंच शुशिलाताई घडसे,भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे हे उपस्तीत होते तसेच या कार्यक्रमासाठी डी पी पोटभरे, डॉ भागवत साळवे ,मंदाताई साळवे यांनी भोजनदान दिले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहन काकडे, बळीराम काकडे, बाबासाहेब घनघाव,दयानंद साळवे, नितिन डोंगरे,एन डी गायकवाड,डी पी वाघमारे,संभाजी धाईजे,चंद्रकला साळवे,अतिंका गायकवाड,कावेरी साळवे,विशाखा वाघमारे, गायकवाडताई, गिरजाबाई पोहरे,कांताबाई हिरवे,रमाताई राजभोज सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले,

## ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६९ रक्तदात्यांचे रक्तदान

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखी मानवंदना

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन भीम आर्मी दिंद्रुड च्या वतीने करण्यात आले होते.६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६९ रक्तदात्यांनी रक्तदान करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखी मानवंदना दिली.**

‘‘सामाजिक ऐक्य जपून महामानवाला वंदन करूया‘‘ हा शुद्ध हेतू ठेवून येथील भीम आर्मीच्या वतीने जुने बस स्थानक ठिकाणी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. ०६ डिसेंबर हा घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आहे. त्यांना मानवंदना म्हणून शुक्रवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले




होते.६९ रक्तदात्यांनी याप्रसंगी रक्तदान केले. वैद्यनाथ ब्लड बँकेचे डॉ. सूर्यकांत मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बिबीशन सांगळे, अंजली पंचबुधे,योगेश सांगळे, भगवान सांगळे ,गणेश राठोड,पायल पवार यांनी रक्त संकलन केले.सिद्धार्थ मायंदळे, सचिन देशमाने, सिद्धार्थ देशमाने, बाबासाहेब देशमाने, रोहित देशमाने,सुनील वावळकर, मनोज देशमाने, निलेश किर्ते, दीप देशमाने, प्रदीप देशमाने, बाळू देशमाने, राहुल मोरे, मुन्ना ठोंबरे,मिनाज शेख, राजू पठाण,शफिक शेख, मुन्ना आत्तार, अमोल देशमाने यांनी या शिबिराचे आयोजन केले होते.

## देवी बाबुळगाव ते हिंगणी रस्ता झाला खुला: तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मध्यस्थीला यश

**बीड । प्रतिनिधी**

**देवी बाबुळगाव ते हिंगणी या सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीच्या महत्त्वपूर्ण ग्रामीण रस्त्याचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे . गुरुवार दि . ४ डिसेंबर रोजी हा रस्ता अधिकृतपणे खुला करण्यात आला . अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या मनात साठलेली वेदना , चिखलातून वाट काढण्याची बंधनं आणि रोजच्या धावपळीतला त्रास याला आज पूर्णविराम मिळाला आहे . देवराव वस्तीसह परिसरातील शेतकऱ्यांचा संघर्ष आता संपला आहे.**

हक्काचा रस्ता असूनही अनेक वर्षे वाद सुरू होता . गावकरी , सरपंच यांनी मध्यस्थी करून रस्ता खुला करण्याचा प्रयत्न अनेकदा केला , पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही . शेतकऱ्यांच्या पायातील चिखल , खांद्यावरचा शेतीमाल आणि मनातील निराशा ही जणू या रस्त्याचीच कहाणी झाली होती . अखेर राज्याच्या महसूल खात्याच्या निर्णयांमुळे आणि जिल्हा प्रशासनाच्या संवेदनशील भूमिकेमुळे प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे दृग्गोचर झाली . राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतरस्त्यांबाबत घेतलेल्या निर्णयांमुळे जिल्हास्तरावरील अधिकारी अधिक सतर्क झाले आहेत . संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर शेतकऱ्यांच्या रस्त्याविषयी नेहमीच सजग असतात आणि रस्ते तात्काळ मोकळे करण्याचे स्पष्ट आदेश देतात . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने दखल घेण्यासाठी प्रसिद्ध आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे तहसीलदार आणि अधिनस्त महसूल अधिकाऱ्यांना थेट संपर्क करत शेतकऱ्यांची कामे तत्काळ मार्गी लावण्याबाबत आग्रही असतात . उपविभागीय अधिकारी कविता जाधव शेतकऱ्यांच्या समस्या कणवाळूपणे ऐकून त्यावर उपाय शोधण्यात तत्पर असतात. वरील प्रकरणात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः पुढाकार घेतला . मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे आणि ग्राम महसूल अधिकारी कमलेश निर्मळ यांनी सतत भेटी देऊन पंचनामे केले , समजूत काढली आणि रस्त्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी विविध प्रयत्न केले . अखेर या रस्त्यावर मुरूम टाकण्यात आला आणि काम पूर्ण करण्यात आले. गुरुवार दि . ४ डिसेंबर रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः या रस्त्याला भेट दिली . त्यांच्या सोबत मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे , ग्राम महसूल अधिकारी कमलेश निर्मळ आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि रस्ता खुला झाल्याचे जाहीर केले . अनेक वर्षे अडकलेला प्रश्न प्रशासनाच्या पुढाकारामुळे मिटला असल्याने ग्रामस्थांनी तहसीलदारांचे मनापासून आभार मानले. या रस्ता खुला करण्याच्या कामात ज्यांची उपस्थिती नोंदवली गेली त्यात भास्कर जोगदंड , भारत शिंदे , कैलास शिंदे , अण्णा नायनवाडे , सखाराम जोगदंड , गोवर्धन जोगदंड , रत्नाकर जोगदंड , विकास जोगदंड , बाबू जोगदंड , बारकू शिंदे , लहू जोगदंड , बंकट जोगदंड , मेहर जोगदंड , संतोष जोगदंड , सुरेश जोगदंड , सुदर्शन जोगदंड , बंडू जोगदंड , बापू जोगदंड , अशोक जोगदंड , मोहन जोगदंड , पोपट जोगदंड यांचा



समावेश आहे. गावाच्या पायवाटेवर आज मुरूम नाही , तर आशेचा नवा पाया टाकला गेला आहे . संघर्षाच्या वर्षानुवर्षांच्या धुळीत दडलेला दिलासा आता शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलून आला आहे . अधिकारी व ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांतून अखेर हा रस्ता खुला झाला आणि हिंगणीकडे जाणारा मार्ग नव्या शक्यतांनी उजळून निघाला आहे.

# पान १ वरून...

### उसाच्या पैशातून शेतकऱ्यांचे कर्ज

घेतात. यामुळे शेतकरी कर्जमाफीचा लाभ घेऊ शकत नाहीत. असे झाल्यास शेतकरी थकीत राहत नाहीत आणि ते नियमित कर्जदार होतात, ज्यामुळे त्यांना कर्जमाफीच्या योजनेपासून वंचित राहावे लागते. हा प्रश्न वारंवार निर्माण होत असल्याचा आरोपही पत्रकात करण्यात आला आहे. त्यामुळे, जर कारखान्यांनी ऊस पेमेंटमधून शेतकऱ्यांचे कर्ज बँकांना वळवले आणि त्यामुळे शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिला, तर याची पूर्ण जबाबदारी साखर कारखान्यांचीच असेल. असा इशारा किसान सभेने दिला आहे. तसेच, शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिल्यास शेतकऱ्यांमध्ये जो असंतोष निर्माण होईल, त्याची जबाबदारी सुद्धा कारखान्यांवर राहील. त्यामुळे कारखान्यांनी ऊस पेमेंटमधून परस्पर कर्ज वसूल करण्याची प्रक्रिया करू नये, अशी मागणीही किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केले आहे. दुसरीकडे कापूस खरेदीसाठी सीसीआयने (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) ठरवलेली ५ क्विंटल ६० किलो प्रतिएकर मर्यादा रद्द करून, ती १५ क्विंटलपर्यंत वाढवावी, या मागणीसाठी शिवसेना (ठाकरे गट) आणि शेतकऱ्यांनी काही ठिकाणी आंदोलन सुरू केले आहे. या हंगामात अतिवृष्टी-अवर्षणामुळे कापूस उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. तरीही शेतकऱ्यांना खरेदी प्रक्रियेत मर्यादांमुळे अडचणी भेडसावत असल्याने शिवसेनेने थेट आंदोलनाच मार्ग पत्कारला आहे. यासाठी विदर्भात काही ठिकाणी आंदोलन करण्यात आले आहे. याशिवाय खरेदीनंतर १० ते १२ दिवसांनी पैसे मिळत असल्याने शेतकरी त्रस्त असून, नियमाप्रमाणे २४ तासांत चुकारे देण्याची मागणीही करण्यात आली आहे. शिवसेनेने खरेदी मर्यादा १५ क्विंटल, दोन वाहनांची अट रद्द, ग्रेडरची वागणूक सुधारावी, ओलावा तपासणी बंद करून सरसकट भाव द्यावा, तसेच तलाठी पेरा दाखल्यावर खरेदी मान्य करावी, अशा पाच प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. उत्पादनाच्या तुलनेत ५.६० क्विंटल मर्यादा अव्यवहार्य असून ती शेतकऱ्यांवर अन्यायकारक आहे, असा आरोप करीत मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेने दिला आहे.

------------

### शिर्डीला निघालेल्या भाविकांना

मंगळसूत्र इतर दागिने चोरट्यांनी काढून घेतले. तसेच, पुरुषांच्या गळ्यातील चैन आणि अंगठ्या असा साडेतीन लाख रुपयांचा ऐवज हिसकावून चोरटे पसार झाले. याप्रकरणी, भाविक शिवप्रसाद यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या सर्व प्रकारामुळे राष्ट्रीय महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

------------

### मतमोजणी लवकर करण्यास

आणि नगरपरिषद निवडणुका काही कारणास्तव झाल्या नाहीत तर २ तारखेला मतदान झालेल्या निवडणुकांची मतमोजणी होणार असल्याचे देखील सांगितले. तसेच सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयात कितीही याचिका असल्या तरी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीत निवडणूक झाली पाहिजे असे देखील सांगितले. २१ डिसेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २४ नगरपरिषद व नगरपालिकांच्या निवडणुकांची मतमोजणी एकत्रित घेण्याचे आदेश दिले होते. यामुळे ३ डिसेंबरला होणारी मतमोजणी पुढे ढकलण्यात आली होती. या निर्णयाविरोधात राजकिरण बरवे यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. आधीच पार पडलेल्या निवडणुकांचा निकाल तात्काळ जाहीर करावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. त्यानुसार या प्रकरणाची सुनावणी सुप्रीम कोर्टात झाली.

--------------

### ईडीकडून ११ वर्षात

ऑफ मनी लॉन्ड्रींग एक्ट अंतर्गत दोषी ठरवण्यात आल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे सर्वाधिक ३८ आरोपींना कोर्टाने गेल्या आर्थिक वर्षात(२०२४-२५ ) दोषी ठरवले गेले आहे. ही आकडेवारी केंद्रीय आर्थिक राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत शेअर केली आहे. पंकज चौधरी यांच्या डेटानुसार या प्रकरणात दोषी ठरलेल्या लोकांची संख्या खूपच कमी आहे. फेडरल फायनान्शियल क्राईम्स तपास संस्थेच्या अधिका-यांनी नाव उघड न करण्याच्या अटीवर दावा करताना सांगितले की यातील दोषींच्या शिक्षेचा दर सुमारे ९४ टक्के आहे. कारण कोर्टात केवळ ५५ केसची ट्रायल संपली आहे. यातील ५२ केसमध्ये १२० लोकांना शिक्षा झाली आहे. एजन्सी आधीही अनेकदा हाच स्टँड घेतला होता. २०१४ पूर्वी कोणतीही शिक्षा झाली नव्हती असाही दावा केला जात आहे.

**२०२५ मध्ये सर्वाधिक केस**

१ जून २०१४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ च्या दरम्यान ईडीने प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉड्री एक्टअंतर्गत ६,३१२ केस रजिस्टर केले. यातील १,८०५ प्रॉसिक्युशन कंम्पिट ( चार्जशीट ) आणि ५६८ सप्लीमेंटरी चार्जशिट फाईल केली गेल्याचे मंत्री पंकज चौधरी यांनी दिलेल्या माहितीतून उघड होते. एजन्सीने सर्वात जास्त ३३३ केस २०२४-२५ मध्ये दाखल केले. त्यामुळे सर्वात जास्त ३८ लोकांना शिक्षा झाली.

**९३ केसचा तपास बंद**

१ ऑगस्ट २०१९ रोजी प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉड्री एक्टमध्ये बदल केल्यानंतर ईडीला स्पेशल कोर्टासमोर आपल्या केसमध्ये क्लोजर रिपोर्ट फाईल करण्याची परवानगी मिळाली. तपास यंत्रणेने ९३ प्रकरणात केसचा तपास बंद केला आहे.

------------

### वृक्षतोडीवरुन दोन्ही शिवसेनेचे

राहिलेला आहे. मात्र तपोवनच्या वृक्षतोडीवर दोन्ही सेनेची एकच भुमिका असल्याचे दिसून येत आहे. लोकसभेत बोलताना खासदार वाजे म्हणाले की, तपोवन परिसर केवळ हिरवाईचा पट्टा नसून प्रभू श्रीरामांच्या वास्तव्याने पावन झालेला धार्मिक वारसा, जैवविविधतेचे केन्द्र आणि नाशिकचे फुफ्फुस आहे. ‘‘हिंदू धर्म निसर्गपूजनाची शिकवण देतो. अशा पवित्र भूमीत हजारो झाडे तोडणे म्हणजे श्रद्धा, पर्यावरण आणि सांस्कृतिक वारसा तिन्हीवर कुऱ्हाड’’, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. तपोवनात अनेक पक्षी, प्राणी, व दुर्मिळ जैववैविध्य आढळत असून या परिसंस्थेचा विनाश नाशिककरांच्या भावनांना वेदना देणारा असल्याचे ते म्हणाले. खासदार वाजे यांच्या पुढाकाराने तपोवन प्रश्न राज्याबाहेर जाऊन देशाच्या सभागृहातही प्रतिध्वनीत झाला आहे. नाशिककरांचा संताप आणि आंदोलनाची उर्मी केंद्र सरकारने लक्षात घेतली पाहिजे, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. संसदेतल्या प्रभावी भाषणाने स्पष्ट संकेत मिळाले की तपोवन बचावासाठीचा लढा आता निर्णायक टप्प्यात आहे. नाशिककरांचा वैताग, जनभावना, धार्मिक महत्त्व आणि पर्यावरणीय धोका या सर्वांचा संगम असलेला हा मुद्दा आता सरकारकडून निर्णायक प्रतिसादाची वाट पाहत आहे.

**‘‘वन निघून गेल्यावर तपोवनात काय उरेल?’’**

३ डिसेंबर रोजी तपोवन भेटीदरम्यान खासदार वाजे यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. नागरिक, तपोवन बचाव समिती व पर्यावरणतज्ज्ञांकडून माहिती घेतल्यानंतर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यावेळी बोलताना ते म्हणाले की, ‘‘तपोवन या नावातच सर्व काही आहे. ‘वन’ नाहीसे झाले तर तपोवन फक्त सिमेंटचे जंगल उरेल. नाशिकचे फुफ्फुस कायमचे हरवेल.’’ एक्झिबिशन सेंटरसाठीही त्याच परिसरात निविदा निघाल्याने नाशिककरांचा संशय अधिकच वाढल्याचे त्यांनी सांगितले.

--------------

### सरकारी कर्मचाऱ्यांना

राज्य निवडणूक आयोगांनी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना एसआयआरची कर्तव्ये पार पाडावी लागतील. देशाचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने सांगितले की, राज्य सरकारी कर्मचारी एसआयआरसह इतर वैधानिक कामे करण्यास बांधील आहेत. राज्य सरकारांचेही कर्तव्य आहे की त्यांनी निवडणूक आयोगाला कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत. न्यायालयाने म्हटले की, जर एसआयआरच्या कामात गुंतलेल्या बूथ स्तरीय अधिकाऱ्यांवर कामाचा ताण जास्त असेल, तर राज्यांनी आणखी कर्मचारी नियुक्त करावेत. खंडपीठाने सांगितले की यामुळे एसआयआरच्या कामाचे तास कमी करण्यास मदत होईल आणि आधीच नियमित कामाव्यतिरिक्त एसआयआर करत असलेल्या अधिकाऱ्यांवरील दबाव कमी होईल. तामिळनाडू, बंगालसह अनेक राज्यांच्या सरकारने सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाद्वारे केल्या जात असलेल्या एसआयआर च्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले आहे. या प्रकरणावर मागील सुनावणी २ डिसेंबर रोजी झाली होती. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला सल्ला दिला की, केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या सुरू असलेल्या तयारी लक्षात घेता, एसआयआर फॉर्म सादर करण्याची अंतिम मुदत आणखी वाढवावी. खंडपीठाने सांगितले की, निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिका-यांकडे भरलेले फॉर्म अपलोड करण्यासाठी पुरेसा वेळ असावा. सरन्यायाधीशांनी सांगितले की हे आणखी पुढे ढकलले जावे जेणेकरून जे लोक यापासून वंचित राहिले आहेत, त्यांनाही संधी मिळू शकेल.

----------

### लाडक्या बहिणींसाठी आनंदाची

बहिणींच्या खात्यात ही रक्कम जमा करू शकते. तथापि, सरकारने याविषयी कोणतीही अधिकृत घोषणा अद्याप केलेली नाही. दरम्यान. योजनेचा लाभ सुरू ठेवायचा असल्यास सर्व लाभार्थ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया त्वरित पूर्ण करणे बंधनकारक आहे. ई-केवायसी न केल्यास पुढील निधी थांबवला जाऊ शकतो.

------------

### ‘मंदिराचा पैसा देवाचा, बँका वाचवण्यासाठी

व्याज देणाऱ्या राष्ट्रीय बँकेत जात असतील तर त्यात काय चूक आहे? मंदिरातील पैसा देवतेचा आहे. म्हणून तो संरक्षित करणे, जतन करणे आणि केवळ मंदिरासाठी वापरला पाहिजे. ते सहकारी बँकेच्या उत्पन्नाचा किंवा अस्तित्वाचा आधार बनू शकत नाही असे सरन्यायाधीश म्हणाले. याचिकाकर्त्या बँकांचे प्रतिनिधित्व करणारे वकील मनु कृष्णन यांनी असा युक्तिवाद केला की उच्च न्यायालयाचा दोन महिन्यांत ठेवी परत करण्याचा अचानक आलेला आदेश अडचणी निर्माण करत आहे. यावर, सरन्यायाधीश म्हणाले, तुम्ही जनतेसमोर तुमची विश्वासार्हता प्रस्थापित केली पाहिजे. जर तुम्ही ग्राहकांना आणि ठेवींना आकर्षित करू शकत नसाल तर ती तुमची समस्या आहे. न्यायमूर्ती बागची यांनी सांगितले की अंतिम मुदत संपताच ठेवी परत करणे ही बँकेची जबाबदारी आहे. वकिलाने प्रतिवाद केला की बँका ठेवी बंद करण्यास विरोध करत नाहीत, परंतु निधी परत करण्याचा अचानक आदेश दिल्याने अडचणी निर्माण होतील. मात्र सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्या, परंतु याचिकाकर्त्यांना केरळ उच्च न्यायालयात मुदतवाढीसाठी अर्ज दाखल करण्याचे स्वातंत्र्य दिले. ऑगस्टमध्ये केरळ उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या निर्णयाला आव्हान देत, मनथनवाडी सहकारी संस्था लिमिटेड आणि थिरुनेली सेवा सहकारी बँक लिमिटेड यांनी या याचिका दाखल केल्या होत्या. केरळ उच्च न्यायालयाने संबंधित बँकांना थिरुनेली मंदिर देवस्वोमच्या सर्व ठेवी दोन महिन्यांत परत करण्याचे आदेश दिले होते.

--------------------

### आयोगाने संवैधानिक शिस्त

तसेच नगरपंचायत निवडणुका अखेरच्या क्षणी लांबणीवर टाकण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत हायकोर्टाने खडे बोल सुनावले. मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठापुढे संबंधित याचिकांवर आज सुनावणी झाली. ऐनवेळी निवडणूक लांबणीवर टाकणे टाळता येण्यासारखे होते, असे न्यायालयाने म्हटले. आयोगाकडून निवडणुका पुढे ढकलण्याचा झालेला निर्णय योग्य नव्हता, अशा शब्दात उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला तंबी दिली. अशी कोणतीही आपात्कालीन स्थिती नव्हती की, ज्यामुळे निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ०६ डिसेंबर २०२५



## थोडक्यात



### श्री स्वामी समर्थ केंद्रात सप्ताह सांगता; आरतीसोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

पाटोदा । प्रतिनीधी

पाटोदा येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात दत्त जयंतीनिमित्त आयोजित सप्ताह उत्सव भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. सात दिवस चाललेल्या जप, पारायण आणि यज्ञामुळे परिसरात अध्यात्मिकतेचे वातावरण निर्माण झाले होते. सप्ताह सांगतेसाठी स्त्री-पुरुष भक्तांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.

आ सुरेश आण्णा धस यांचे स्वीय. सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांच्या हस्ते आरती सप्ताह सांगतेच्या दिवशी आ सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांच्या हस्ते श्री स्वामींची महाआरती पार पडली. आरतीनंतर त्यांनी उपस्थित भक्तांना संबोधित करत आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला परिसरातील मोठ्या संख्येने स्वामीभक्त हजर होते.भक्तिरस, नामस्मरण आणि आध्यात्मिकतेने परिपूर्ण असा सप्ताह सोहळा उत्साहात पार पडल्याने पाटोदा परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये कै.कांतराव आवरगावकर यांना श्रद्धांजली

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी उपाध्यक्ष स्वर्गीय रामरावजी आवरगावकर यांचे चिरंजीव श्री. कांतराव रामराव आवरगावकर यांचे पहाटे दुःखद निधन झाले. त्यांना तीन मुले, एक मुलगी, पत्नी व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या आत्म्यास शांती मिळण्यासाठी महाविद्यालयामध्ये श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर व विद्यार्थी कर्मचारी उपस्थित होते

### स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख स्मृती पुरस्कारांचे १४ डिसेंबर रोजी देवडी येथे वितरण

बीड : देवडी येथील स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारया विविध पुरस्कारांचे वितरण रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी देवडी येथील माणिकबागेत आदर्श गाव योजनेचे अध्यक्ष श्री. पोपटराव पवार आणि उपमुख्यमंत्र्यांचे आरोग्य कक्ष प्रमुख श्री. मंगेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.. प्रतिष्ठानचे अध्यक्ष एस.एम.देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे ही माहिती दिली आहे..

प्रतिष्ठानच्यावतीने स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कृषी, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणारया मान्यवरांचा दरवर्षी गौरव केला जातो.. २०२४ च्या पुरस्कारांसाठी स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक सेवा पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते श्री. अमर हबीब यांना जाहीर करण्यात आलेला आहे.. पत्रकारितेच्या क्षेत्रात गेली ४५ वर्षे कार्यरत राहून जनतेला न्याय मिळवून देणारे माजलगाव समाचारचे संपादक श्री. सुहास देशमुख आणि कृषी क्षेत्रातील अनेक अडचणींवर मात करून शेतीत विविध प्रयोग करणारे शेतकरी श्री. गोरख झाटे यांची निवड करण्यात आली आहे.. या सर्व मान्यवरांना १४ डिसेंबर रोजी पोपटराव पवार आणि मंगेश चिवटे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.. यावेळी अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने बीड जिल्हयातील काही ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्यात येणार आहे..तसेच अपंगांसाठी कार्य करणारे मुंबईचे पत्रकार दीपक कैतके आणि मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल दिलीप सपाटे यांचा सत्कार करण्यात येणार आहे.. यावेळी परिषदेचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येनं उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन एस.एम देशमुख यांनी केले आहे.

## शंभरचिरा-पाटोदा रस्ता कामात मोठा भ्रष्टाचार?

### ॲड. नरसिंग जाधव यांचा आरोप; उच्चस्तरीय चौकशी व कारवाईची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

**जवळाला फाटा ते पाटोदा (शंभरचिरा) दरम्यानच्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या ५.३ किलोमीटर रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जा व आर्थिक गैरव्यवहार होत असल्याच्या आरोपांमुळे संतप्त नागरिकांनी आज (५ डिसेंबर २०२५) तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले.**

या कामासाठी शासनाकडून ₹६६१.११ लाख (सुमारे ₹६.६१ कोटी) निधी मंजूर असूनही प्रत्यक्ष कामामध्ये गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला.

अ‍ॅड. जाधव यांचा ठेकेदारप्रशासनावर थेट आरोप

उपोषणादरम्यान अ‍ॅड. नरसिंग जाधव यांनी रस्त्याच्या गुणवत्तेच्या नावाखाली भ्रष्टाचार झाल्याचे दस्तऐवजांसहित मांडले. ''नियम धाब्यावर बसवून निकृष्ट सामग्रीचा वापर केला जात आहे. शासन, ग्रामविकास विभाग, ग्रामीण रस्ते विकास संस्था यांना अनेक वेळा तक्रारी दिल्या तरी ठेकेदार पुन्हा तेच काम सुरू करतो. सार्वजनिक निधीची उघड लूट चालली आहे; हे अजिबात सहन केले जाणार नाही,'' असे जाधव म्हणाले.



### न्याय न मिळाल्यास हायकोर्टात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा

उपोषणकर्त्यांनी प्रशासनाला खालील मागण्या सादर केल्या

रस्त्याच्या निकृष्ट कामाची उच्चस्तरीय समितीकडून तातडीने चौकशी करावी. नागरिकांच्या पैशाची लूट करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकावे. या कामावर देखरेख करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात यावी. अंदाजपत्रक व तांत्रिक मानकांनुसारच गुणवत्तापूर्ण काम पूर्ण करणे बंधनकारक करावे.

हायकोर्टात जाण्याचा इशारा

नागरिकांनी चेतावणी दिली की, ''जर प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन गैरव्यवहार थांबवला नाही, तर आम्हाला उच्च न्यायालयात जनहितार्थ याचिका दाखल करावी लागेल.

रस्त्याच्या कामातील कथित भ्रष्टाचारावरून परिसरात तीव्र नाराजी असून पुढील काही दिवसांत या आंदोलनाला वेग येण्याची शक्यता आहे.

## गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सुवर्णपदक विजेती आभा मुंडेसह परळीतील जलतरणपटूंचा सत्कार संपन्न

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने जलतरण क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय तथा राज्यस्तरीय पातळीवर उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या परळीतील जलतरणपटूंचा सत्कार झी लिटेरा स्कूलच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला. राष्ट्रीय पातळीवर दिव्यांग जलतरणात सलग दोन वर्ष पाच : पाच सुवर्णपदकांची कमाई तसेच पहिल्या वहिल्या राष्ट्रीय दिव्यांग योगासन स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई करून परळीच नव्हे तर बीड जिल्ह्याचे नाव उज्वल करणाऱ्या आभा गणेश मुंडे हिचा यावेळी विशेष गौरव करत पहिल्याच प्रयत्नात जलतरणात राज्यस्तरापर्यंत मजल मारणाऱ्या चिरंजीव वरद लांडगे, कुमारी सिद्धी चाटे, कुमारी राजनंदिनी चाटे, कुमारी आर्या वेरुळे यांच्यासह उदयोनमुख जलतरणपटू कुमारी स्वरा चाटे यांचाही यावेळी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पहार देत फेटा बांधून सत्कार करण्यात आला.



याबाबत अधिक माहिती अशी की, परळी तालुक्याची भूमिपुत्र असणाऱ्या कु. आभा मुंडे हिने नुकत्याच हैदराबाद येथे पार पडलेल्या राष्ट्रीय दिव्यांग जलतरण स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा पाच सुवर्णपदकांची कमाई करत विशेष भीम पराक्रम केला आहे. तसेच यावर्षीच्या पहिल्या राष्ट्रीय दिव्यांग योगासन स्पर्धेतही सुवर्णपदक पटकावून तिने दुहेरी यशाची नोंद केली आहे. दरम्यान राष्ट्रीय स्तरावरील आभाच्या यशाबरोबरच जलतरणात आभाची प्रेरणा घेत पहिल्याच प्रयत्नात जलतरणात राज्यस्तरीय मजल मारणाऱ्या परळीचे जलतरणपटू कुमारी आर्या वेरुळे, चिरंजीव वरद लांडगे, कुमारी सिद्धी चाटे, कुमारी राजनंदिनी चाटे यांनी देखील आपल्या जलतरणातील प्राविण्याने परळी व बीड जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे. प्रशिक्षक गणेश मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही पाचही मुले यशस्वीरीत्या पुढे सरसावली आहेत. या कामगिरी बद्दल या सर्व जलतरणपटूंचा देखील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उद्योनमुख दिव्यांग जलतरणपटू असलेल्या कुमारी स्वरा चाटे हिचाही या कार्यक्रमात यथोचित सन्मान करण्यात आला.

झी लिटेरा स्कूलच्या प्रशस्त सभागृहात पार पडलेल्या या प्रतिभावंतांच्या गुणगौरव सोहळ्याचे सूत्रसंचालन गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे आस्थापना विभाग प्रमुख प्रकाश चाटे यांनी केले. या गौरव सोहळ्यात मान्यवरांनी या खेळाडूंच्या कार्याचा गौरव करताना परळीतील जलतरण क्षेत्राला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता परळी शहर पुढील काही वर्षात जलतरण क्षेत्रामध्ये भक्कम केंद्र बनण्याची आशा व्यक्त केली. याप्रसंगी झी लीटेरा स्कूलचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा, परळीचे गटशिक्षणाधिकारी गणेश गिरी, झी लिटेरा स्कूलचे प्राचार्य कैलास घुगे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी कोकणे साहेब, बालासाहेब दहिफळे, गोविंद कराड, श्रीमती हिना अन्सारी, प्रकाश चाटे यांच्यासह दिव्यांग समावेशित शिक्षण विभाग पंचायत समिती परळी वैजनाथ चे सर्व कर्मचारी तथा येथील गटशिक्षण अधिकारी कार्यालयाचे सर्व कर्मचारी तसेच पालक श्री. गणेश मुंडे, श्री. वैजनाथ वेरूळे, पत्रकार श्रीराम लांडगे आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

दै.राज्य लोकतंत्र दि.६ डिसेंबर २०२५

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY NAME FOR PASSPORT ISSUANCE
OLD NAME: ARUN BHAGWANRAO MHASKE
NEW NAME: ARUN BHAGWAN MHASKE
PRESENT ADDRESS: 83, COURT ROAD, AMBAD,
DIST. JALNA, MAHARASHTRA – 431204
MOBILE NUMBER:
9561207009
AFFIDAVIT NO.: 53AB847488
NOTED & REGISTRED SR NO:- 57342025

## पान ६ वरुन...

### निजामकालीन तहसील

का आहे, गुत्तेदाराला विलंबाचे संरक्षण मिळते आहे का, तसेच योग्य प्रक्रिया पाळून पाडकाम झाले की नाही, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल भैया जाधव आणि शिवसेना प्रमुख मुकुंद शिंदे यांनी केली आहे.

### केकानवाडी शिवारात

भांगे राहणार वडवणी जी. बीड या दोघांना मुद्देमाला सह ताब्यात घेतले असून यांच्याविरुद्ध पो. हे. काँ जमीर अलाउद्दीन शेख यांच्या तक्रारी वरून गुन्हा दाखल करण्यात आला असून गु रा न न ४४७/ २०२५ कलम ६५ (ई), ८३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अनन्वे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांचे मार्गदर्शना खाली पो. हे. काँ. पवार हे करत आहेत.

### पुणे येथे प्राचार्य देवराम

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मा.श्री.अण्णासाहेब बनसोडे महाराष्ट्र राज्य विधानसभा उपाध्यक्ष तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.श्री.इंजि.देवेंद्र तायडे शहरआध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड, मा.श्री.सुकुमार कांबळे , प्रसिद्ध गायक साजन बेंद्रे ,कांचन वाघमारे, कार्यक्रमाचे संयोजक मा.श्री.शिवाजीराव झोडगे,रवी कांबळे सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत भारतीय संविधानाची प्रत,स्मृतीचिन्ह,प्रशस्तिपत्र देऊन प्राचार्य देवराम सारोक्ते व पत्रकार अर्जुन मुंडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्यामुळे आणखीन शैक्षणिक सामाजिक कार्य करण्यासाठी बळ व प्रेरणा मिळाली आहे अशी प्रतिक्रिया पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्यांनी दिली.या पुरस्कार वितरण सोहळ्याला वडवणी येथील श्री.निवांत रामचंद्र सस्ते साहेब(कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी)श्री.निलेश अनेराव(इंजिनियर).श्री.ऋषिकांत तांदळे सर (मुख्याध्यापक, साने गुरुजी माध्यमिक विद्यालय,परभणी के ),श्री.समाधान उजगरे सर (साने गुरूजी माध्यमिक विद्यालय परभणी .के).श्री.बाळासाहेब सावंत,श्री.बबन शेळकंदे ,श्री.रोहित सारोक्ते यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

### जिल्ह्यातील चार तीर्थक्षेत्रावर

मंदिर-बुधनेश्वर (मढ, ता. बुलढाणा)वाशिम जिल्हा : बालाजी (वाशिम शहर)यवतमाळ जिल्हा : कमलेश्वर शिव मंदिर (लोहारा, ता. यवतमाळ), शिव मंदिर (पिंपरी कलागा, ता. नेर परसोपंत), दक्षेश्वर (लालखेड) व शिव मंदिर (चिकन खुर्द, ता. दारव्हा)भंडारा जिल्हा : वाळकेश्वर मंदिर (वाकेश्वर, ता. मोहाडी)

कार्यपद्धतीनुसार माहितीपट तयार करण्याचे निर्देश.

हा माहितीपट माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये यांना या प्रकल्पासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. या माहितीपटाद्वारे महाराष्ट्रातील समृद्ध सांस्कृतिक आणि स्थापत्य वारसा देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

### माजी नगरसेविका

हॉल क्लिनिक, पुणे येथे अवयवदान प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या उदात्त कार्याबद्दल रुग्णालयाच्या तर्फे गयाबाई आळणे यांना ‘गार्ड ऑफ ऑनर’ देऊन सन्मानपूर्वक मानवंदना देण्यात आलीजी त्यांच्या मानवसेवेची सर्वोच्च ओळख ठरली.त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)

रहमत पठाण, इरफान शेख, मुझम्मील लाला, शेख आमेर, शेख अमन तसेच पक्षातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी त्यांचे मनापासून अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शेख शाकेर यांनी बोलताना सांगितले की, ''अल्पसंख्यांक समाजाच्या हितासाठी व न्यायासाठी आवाज बुलंद करण्यासाठी मी सदैव तयार आहे. जनतेच्या विश्वासाला पात्र ठरवून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या झेंड्याखाली शहराचा विकास व समाजातील समस्या सोडवणे हा माझा प्रमुख उद्देश असेल.नियुक्तीच्या या निर्णयाने युवकांमध्ये एक नवी ऊर्जा निर्माण झाली असून आगामी काळात शहरातील अल्पसंख्यांक घटकांची राजकीय व सामाजिक शक्ती अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### दत्त संस्थान, बालाघाट

मूर्तीचा अभिषेक, गोमातेची पूजा यांसारखे पारंपरिक विधी भाविकांच्या उपस्थितीत पार पडले. सकाळी उदंडवडगाव (शिवाजीनगर) येथील भजन मंडळाने सादर केलेले संगीत भजन भाविकांच्या मनाला स्पर्शून गेले. रात्री मोरगाव, मांजरसुंबा व वरवटी येथील भजनी मंडळाने सादर केलेल्या जागरणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. सोहळ्यात साजरी करण्यात आलेली सती अनुसया मातांची झाकी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या झाकीची कु.प्रार्थना अमोल ढास यांनी प्रभावीपणे सादर केली. दत्त संस्थानाच्या परिसरात आयोजित या पवित्र जन्मोत्सव सोहळ्यास परिसरातील विविध गावांमधील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली व भक्तिभावाने सहभाग नोंदविला.

### पत्रकार अविनाश कदम यांना

समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार सीताराम पोकळे यांनी ही माहिती देताना सांगितले की, हा पुरस्कारवितरण सोहळा लवकरच अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. पत्रकार अविनाश कदम यांना या आधीही दिल्ली, मुंबई, पुणे, बीड, पनवेल, अहिल्यानगर येथील विविध सामाजिक व पत्रकारीय संस्थांकडून अनेक सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत.पत्रकार कदम यांना जिजाऊ माँसाहेब राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा, आष्टी तालुका युवा पत्रकार संघ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन व कौतुक व्यक्त केले जात आहे.

### दिंद्रुड नगरीत दत्त

वल्लभ दिगंबरा... अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त महाराज कि जय... चा जयघोष करत महिलांनी दत्त जन्माचा पाळणा गात प्रसन्न वातावरण व आनंदोत्सवात दत्तजयंती साजरी करण्यात आली. त्यानंतर दत्तात्रय व देवी महाकाली यांच्या गाण्यांचा रात्री जागर चालला. दिवसभराच्या या आनंदोत्सवात अनेक भाविक भक्त सहभागी झाले होते. मंदिराचे पुजारी सतिश महाराज व काही भक्तगणांनी महाप्रसाद व सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विविध धार्मीक कार्यक्रमांनी दत्तजयंती सोहळा आनंदात साजरा झाला. येथील बाबुराव कांबळे, कृष्णा शेंडगे, आश्विन राऊत, अजय यादव, राजाभाऊ पारेकर आदि भाविकांनी दत्त जन्मोत्सवात परिश्रम घेतले.

### राज्यव्यापी ‘शाळा बंद’

करू नये यासाठी शासनाच्या वतीने दडपशाहीचे तंत्र अवलंबिले जात होते. परंतु दडपशाहीला न जुमानता बीड मधील जवळपास ४०% शाळेत शाळेतील हजारो शिक्षकांनी आंदोलन यशस्वी केले. दरम्यान शिक्षकांना बीडमध्ये शिक्षकांना मोर्चा काढण्यास पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारल्यामुळे शिक्षक संघटनेच्या वतीने

नाराजी व्यक्त करण्यात आली. दुपारी शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत राज्याचे मुख्यमंत्री आणि शिक्षण मंत्री यांना निवेदन देण्यात आले.

## लिंबादेवी यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील पिठ्ठी गावातील ग्रामदैवत लिंबादेवी यात्रेला यंदाही उत्साह, भाविकांच्या श्रद्धा आणि परंपरेची जोड लाभली. दत्तजयंतीनिमित्त दरवर्षी आयोजित केली जाणारी ही ऐतिहासिक व पारंपरिक यात्रा आजही अखंडीतपणे साजरी होत असून, देवीचे मंदिर परिसर भक्तांच्या गर्दीने फुलून गेले होते.



या यात्रेची खास ओळख असलेली लहान बाळाला शिखरावरून टाकण्याची’ प्राचीन प्रथा यंदाही विधिवत पार पडली. नवस फेडण्यासाठी शेकडो कुटुंबांनी देवीसमोर हजेरी लावली. नवस पूर्ण झाल्यावर देवी शिखरावरून बाळांना प्रतीकात्मकरीत्या खाली सोडण्याची परंपरा अनेक वर्षांपासून पाळली जाते. भाविकांच्या मते, ‘देवी नवसाला पावणारी आहे’ अशी लोकश्रद्धा असून, त्यानुसार ही प्रथा आजही कायम आहे.

पिठ्ठी, नायगाव, उखंडा, निरगुडी, तसेच पंचक्रोशीतील गावांमधील नागरिक मोठ्या संख्येने यात्रेस उपस्थित राहिले. सर्वधर्मसमभाव, सामूहिक सहभाग आणि आनंदाचा माहोल यामुळे यात्रेचे सार्थक स्वरूप अधिकच खुलले.लिंबादेवी मंदिर परिसरात दिवसभर धार्मिक विधी, वारी, महाप्रसाद आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरण निर्माण केले होते. ग्रामीण भागातील सर्वांत प्राचीन व लोकप्रिय यात्रांपैकी एक असलेल्या या लिंबादेवी यात्रेला यंदाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## सरपंच वंदना गायकवाड यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

राठा सेवा संघ प्रणीत तानुबाई बिरजे पत्रकार परिषद आष्टी यांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना जिजाऊ माँसाहेब आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान केला जातो. यावर्षीचा हा म ानाचा पुरस्कार आष्टी तालुक्यातील क-हेवडगाव येथील सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समि तीच्या संचालिका सौ. वंदना परिवंत गायकवाड यांना जाहीर झाला असल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार सीताराम पोकळे यांनी दिली.

कष्टाची जाणीव व सत्याची कास !

मेहनत, सातत्याने सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका घेऊन चालतांना कार्यरत असलेल्या क्षेत्रामध्ये नव्याने येऊ पाहणाऱ्या युवकांना नक्कीच प्रेरणा मिळते. दरम्यान, सरपंच सौ. वंदना परिवंत गायकवाड यांना पुरस्कार जाहिर झाल्याबद्द त्यांचे मित्रपरिवार व मान्यवराकडून अभिनंदन होत आहे.

सामाजिक, राजकीय क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण २५ वर्षाच्या आणि प्रभावी कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्या बदल आहे. सौ. वंदना गायकवाड.सरपंच वंदना गायकवाड यांना यांच्या निवडीबद्दल आ. सुरेश धस, माजी सभापती अरुणभैय्या निकाळजे, कड्याचे माजी सरपंच रामशेठ मधुरकर, माजी नगरसेवक सादिक कुरेशी, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, डा. युवराज तुपे, सेवानिवृत पोलीस निरीक्षक मिलींद निकाळजे, माजी नगरसेवक दिपक निकाळजे, नाट्यकलावंत दिग्दर्शक रुपेश निकाळजे, राजेंद्र बोरुडे, सोमीनाथ विधाते, दिलीप राऊत यांच्यासह सर्व क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन केले आहे. सौ. गायकवाड यांबी आदर्श सरपंच पुरस्कारासाठी निवड झाली आहे. पवित्र विधायक कार्य आपल्या हातुन होत आहे. असेच आपल्या हातून निरंतर घडत राहो. आपल्या उल्लेखनीय, प्रभावी कार्यातून एक सक्षम राष्ट्राच्या प्रस्थापनेचा प्रवाह भक्कम होऊन सखोल मानवीय अंतर्मनाचा चेहरा प्रफुल्लित सन्मुख होतो. तुम्ही कार्यरत असलेल्या क्षेत्रात तुम्ही तुमच्या कार्याचा ठसा उमटवला आहेच. आपल्या हातून होत असलेली राष्ट्रसेवा ही खरोखरंच अभिमानाची व कौतुकास्पद बाब आहे.

## वृक्षप्रेमी अशोक आंधळे यांचा वाढदिवस उपक्रमातून साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार केशवराव आंधळे यांचे कनिष्ठ चिरंजीव तथा संस्कार शिक्षण मंडळाचे संचालक वृक्षप्रेमी,शिक्षण प्रेमी, खेळाडू,इंजि.अशोक (भैय्या) केशवराव आंधळे यांचा वाढदिवस दत्त जयंतीच्या दिवशी दि.०४/१२/ २०२५ गुरुवार रोजी होता त्यानिमित्त अशोक भैय्या मित्र मंडळ वडवणी यांच्या वतीने विविध उपक्रम घेऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.



वृक्षप्रेमी, क्रिकेट व फुटबॉलचे खेळाडू असणारे संचालक, इंजिनीयर अशोक भैय्या आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्त अशोक भैय्या आंधळे मित्र मंडळाचे गणेश वारे यांच्या वतीने वृक्षरोपण,क्रिकेट व फुटबॉलची मॅच चे आयोजन करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख निवरकर सर,श्री.राऊत एम.बी.सर,श्री.प्रदीपजी काळे सर,प्रा.अंडील जी.पी.तसेच प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.लाटणे एस.एस.,पर्यवेक्षिका सौ.कुरकुटे एन.आय.,सौ.तांबडे मॅडम,सौ.फासे मॅडम यांनी संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## युवतींनी एड्सबद्दल जागरूक राहून निरोगी समाज घडवावा-सरवदे

गेवराई । प्रतिनिधी

एड्स सारख्या गंभीर रोगावर जनजागृती हाच महत्त्वाचा उपाय आहे. त्यामुळे एड्स होण्याचे विविध कारणे व ते होऊ नये म्हणून करावयाची जनजागृती महत्त्वाची आहे. या संदर्भात महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी एड्स बद्दल जागरूक राहून निरोगी समाज घडवण्यासाठी योगदान द्यावे. असे प्रतिपादन श्री. सुनील सरवदे यांनी केले. ते महिला महाविद्यालय, गेवराई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित एड्स जनजागृती कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे, जिल्हा उप रुग्णालय गेवराई चे श्री. विक्रम तिडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

१ डिसेंबर हा जागतिक एड्स दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच १ ते १५ डिसेंबर हा एड्स पंधरवाडा म्हणून साजरा केला जातो. या पंधरवड्यामध्ये एड्स जनजागृती वर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्या निमित्ताने महिला महाविद्यालय, गेवराई च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभाग जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स जनजागृती पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री. सुनील सरवदे म्हणाले की, एड्स विषयी समाज प्रबोधनासाठी महाविद्यालयीन युवतींची भूमिका महत्त्वाची आहे. युवतींनी पहिल्यांदा एड्स विषयी वस्तुनिष्ठ माहिती घेऊन आपला परिवार व समाज यामध्ये त्याविषयी जनजागृती केली पाहिजे. तसेच बदलत्या काळानुसार अज्ञान, अंधश्रद्धा, गैरसमज व अपप्रचार यांना बळी न पडता खंबीरपणे विविध समस्यांचा सामना केला पाहिजे. असे प्रतिपादन केले.



### महिला महाविद्यालयांमध्ये एड्स जनजागृती कार्यक्रम संपन्न

अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे म्हणाले की, एड्स हा गंभीर रोग असून तो आपल्या रोग प्रतिकारक शक्तीवरच हल्ला करतो. त्यामुळे मानवी शरीर छोट्या-मोठ्या आजारांना सहज बळी पडते. त्यामुळे एड्स सारख्या गंभीर आजारांचा सामना करण्यासाठी जनजागृती करून प्रतिबंध करणे हाच सर्वात मोठा उपाय आहे. यासंदर्भात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेविकांची भूमिका महत्त्वाची आहे. यावेळी उपस्थित विद्यार्थिनी व कर्मचाऱ्यांना एड्स विषयी जनजागृती पर पोस्टरचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण यांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. संगीता आहेत यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. रामहरी काकडे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वयंसेविकांची उपस्थिती होती.

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेत महत्वपूर्ण बदल;

## आता लगेच मिळणार लाभ



'गोपीनाथ मुंडे शेतकरीअपघात सुरक्षा सानुग्रह योजने'चा लाभ आता महाडीबीटी पोर्टलमार्फत थेट ऑनलाईन मिळणार असून, शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

शेतीत काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना ही योजना महत्त्वाची ठरत असून, पूर्वी ऑफलाईन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जांची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. शेतीत काम करताना विविध कारणांमुळे होणाऱ्या अपघातांमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू किंवा अपंगत्वाच्या घटना राज्यात वारंवार घडतात. अशा घटनांमध्ये शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी म्हणून राज्य सरकार १९ एप्रिल २०२३ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना राबवत आहे. या योजनेत शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख रुपये तर एक डोळा किंवा एक अवयव कायमस्वरूपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची मदत दिली जाते. पूर्वी या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी किंवा वारसदारांना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सविस्तर प्रस्ताव आणि आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागत होती. कागदपत्रांतील त्रुटी, पूर्ततेतील विलंब यामुळे अनुदान देण्यास उशीर होत होता. यावर उपाय म्हणून राज्य शासनाने ही संपूर्ण अर्जप्रक्रिया महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. ऑनलाईन अर्जप्रक्रियेमुळे अपघातग्रस्त शेतकरी किंवा त्यांचे वारसदार घराबाहेर न पडता, त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणावरूनच अर्ज भरू शकतील. अर्जाची सद्यस्थितीही महाडीबीटी पोर्टलवर पाहता येणार आहे. पोर्टलवर अर्ज भरल्यानंतर तो थेट कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लॉगिनवर जाईल. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास ती दुरुस्त करण्यासाठी संबंधित शेतकरी किंवा वारसदारांना मोबाईलवर एसएमएसद्वारे सूचना मिळणार आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयांच्या चकरा न मारता त्रुटी ऑनलाइनच दुरुस्त करता येतील. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात येईल आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समिती मंजुरी देईल. त्यानंतर मंजूर अनुदानाची रक्कम थेट डीबीटीद्वारे शेतकरी किंवा वारसदारांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

२०२५-२६ या वर्षाकरिता या योजनेसाठी १२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ४३५९ शेतकरी प्रस्तावांना ८८.१९ कोटी रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने योजना राबविल्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि शेतकरी केंद्रित होणार असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.फ

# आता १५ रुपयांत मिळणार डिजिटल सातबारा

## महसूल विभागाचा ऐतिहासिक निर्णय



मुंबई : शेती करत असताना सातबारा उतारा खूपच महत्वाचा मानला जातो. कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी सातबारा उतारा मागावा लागतो. तलाठ्याकडे जाऊन सातबारा उतारा काढायचे म्हंटले तर सततचे हेलपाटे मारावे लागतात. तसेच तलाठ्याच्या मूडवर सगळे काही करावे लागते. शेतकऱ्याची हीच फरफट रोखण्यासाठी आता राज्य महसूल विभागाने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. डिजिटल सातबाऱ्याला आता त्यांनी कायद्याचे संरक्षण दिले आहे. सरकार कडून डिजिटल ७/१२ ला कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे करोडो शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

तसे बघितले तर डिजिटल सातबारा (७/१२) आधी पण निघत होताच परंतु त्यावर तलाठ्याची स्वाक्षरी आणि स्टॅम्पची गरज लागायची. तलाठी जेव्हा कार्यालयात येईल तेव्हाच त्यावर सही होत असे. अशावेळी तलाठ्यांची वाट बघण्यातच शेतकऱ्याचा दिवस जात असे. आता मात्र महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या नियम १९७१ अंतर्गत हे नवीन आदेश देण्यात आले आहेत. सरकारच्या नवीन नियमानुसार, डिजिटल स्वाक्षरी, क्यूआर कोड व १६ अंकी पडताळणी क्रमांकासह असणारे ७/१२, ८-अ आणि फेरफार उतारे हे आता सर्व सरकारी, निमसरकारी, बँकिंग, न्यायालयीन कामकाजात कायदेशीर व वैध असतील. आता केवळ १५ रुपयांमध्ये अधिकृत ७/१२ उतारा मिळणार आहे. यावर तलाठ्याची स्वाक्षरी आणि स्टॅम्पची गरज नसेल. हा मोठा ऐतिहासिक निर्णय म्हणावा लागेल. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याविषयीचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्याचे टेन्शन आता कायमचे दूर झाले आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखालील महसूल विभागाने मागील वर्षभरापासून शेतकऱ्याच्या फायद्याचे अनेक निर्णय घेतले आहेत. आता यात आणखी एका धडाकेबाज निर्णयाचा समावेश झाला आहे.

# बाजारातून दुधाळ जनावरे घेताना अशी घ्या काळजी



जनावराचा पाठीचा कणा वाकलेला असू नये. जनावरांची पहिली बरगडी दिसणे स्वाभाविक असले तरी तिसरा बरगडी पर्यंत दिसणारी जनावरे अशक्त या प्रकारात मोडतात. गायीच्या पोटाचा तसेच छातीचा भाग लांब, खोल आणि रुंद असावा.उत्तम खाद्य पचवण्याची क्षमता असलेल्या जनावरांची निवड करावी. कास आणि सडाची तपासणी करावी.कासेची खोली मापक व क्षमता पुरेशी असावी.

दुग्ध व्यवसायासाठी बाजारातून जनावरे विकत घेताना अनेक गोष्टीवर लक्ष्य देणे आवश्यक आहे.त्यात महत्वाचे म्हणजे पशुपालकांची गरज,त्याची आर्थिक क्षमता,पाणी व हिरव्या चाऱ्याची उपलब्धता या सगळ्या गोष्टींचा विचार करून आपल्याकडील उपलब्ध परिस्थिती तसेच दुधाळ जनावराची कोणती जात नफा देऊ शकेल अशी जात निवडावी. जर फक्त दूध उत्पादन हाच पशुपालकाचे हेतू असेल तर म्हैस पालन करणे कधीही उत्तम ठरते.

दुधाळ जनावरांची निवड :

जनावराचा पाठीचा कणा वाकलेला असू नये. जनावरांची पहिली बरगडी दिसते स्वाभाविक असले तरी तिसरा बरगडी पर्यंत दिसणारी जनावरे अशक्त या प्रकारात मोडतात. गायीच्या पोटाचा तसेच छातीचा भाग लांब, खोल आणि रुंद असावा.उत्तम खाद्य पचवण्याची क्षमता असलेल्या जनावरांची निवड करावी. कास आणि सडाची तपासणी करावी.कासेची खोली मापक व क्षमता पुरेशी असावी. सड काशेच्या प्रत्येक चतुर्थांश प्रमाणबद्ध असावी. काटकोनात स्थित असावेत. मागील कास उंच,रुंद व घट्टपणे शरीराशी संलग्न असावी. किंचित वर्तुळाकार पद्धतीने मुळास जोडलेली असावी कासेचे विभाजन पुरेशा प्रमाणात संतुलित असावे. पुढची खास संलग्न घट्टपणे संलग्न असून त्याची लांबी मध्यम आणिक्षमता पुरेशी असावी. सड दंडगोलाकार, एक समान आकाराचे व मध्यम लांबी आणि व्यास असावा. कासेस चार व्यतिरिक्त अधिक सड असू नये. सडातून हृदयाकडे जाणारी रक्तवाहिनी प्रशस्त व फुगीर असावेत. जनावरांच्या दातांची पाहणी करून वयाची याची खात्री करता येते. या वयातील जनावरे चार दाती असतात. जनावरांच्या गर्भपाताच्या घटनेचे प्रमाण तसेच कासदाह आजाराचा प्रादुर्भाव कधी झाला होता का याची माहिती घ्यावी. चारही सड पिळुन पाणी उत्तम यामुळे सडनलीका बंद नाही याची खात्री होते. अनेक आजारांचे जनावरांच्या बाह्य लक्षणावरून निदान केले जाऊ शकते जसे की डोळ्यातून अथवा नाकातून स्राव येणेहे जनावर आजारी असल्याचे लक्षण आहे. तसेच योनीमार्ग अथवा गुद्दारातून रक्त किंवा अस्वाभाविक स्रावयेणे योनीच्या आजाराचे लक्षण आहे. आजारी जनावर सुस्त,मलूलव अशक्त झालेली असते.काही आजारात बाह्य लक्षणे दिसून येत नाहीत. आजारापासून वाचण्यासाठी जनावरांची नियमित लसीकरण केले जाते का याची चौकशी करावी. व तसेच पशु वैद्यकीय प्रमाणपत्र दाखवण्याचा आग्रह करावा. आपल्याकडे होलीस्टन संकरित आणि जर्सी संकरित गाई दिसतात. होलिस्टन गायीचे दुधाचे प्रमाण अधिक आहे तर जर्सी संकरित गाईच्या दुधात स्निग्धांश अधिक असते. गरजेप्रमाणे जर्सी किंवा हॉलिस्टन गाईची निवड करावी. संकरित गाई घेताना पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता लक्षात घेता विदेशी रक्ताचे प्रमाण ६२:५० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये. जर्सी संकरित गाई डोंगराळ भागात संगोपनासाठी चांगले आहेत तर होलिस्टन संकरित गाईचे संगोपन पठारी भागात करावे.

# माती टिकेल तर शेती टिकेल आणि शेती टिकेल तर शेतकरी जगेल- मयंक गांधी

देशासाठी आणि शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक महत्त्वाची कोणती गोष्ट असेल तर ती आहे माती. १७२२ साली आपल्या देशाला सोने की चिडीया म्हटल्या जायचे. ज्या वेळेस मातीतील २.५ होता तर आज ०.२ ते ०.३ झाला आहे. ही अतिशय चिंताजनक आणि गंभीर बाब आहे. मातीची गुणवत्ता टिकवणे आणि मृदा संधारण करणे ही काळाची गरज बनलेली असतांना मात्र मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांचा मारा केला जातोय. जलद गतीने श्रीमंत होण्याचा हव्यासच जगाला संकटाच्या खाईत लोटत आहे. उत्पादन वाढीसाठी बेमाप रासायनिक खतांचा वापर करतांना मातीची उपजत गुणवत्ता आपण खराब करत आहोत याकडे होणारी डोळेझाक आपल्याला फार मोठ्या अंधाऱ्या खाईत लोटत आहे आणि याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. आपला देश हा कृषिपूजक देश आहे. सोने की चिडीया असलेल्या आपल्या विस्तीर्ण देशाची विदारक अवस्था होतांना पाहणे हे अतिशय वेदनाजनक आहे. रासायनिक शेतीला आणि रासायनिक खतांना पायबंद होणे अत्यावश्यक आहे. शासन मात्र एका अर्थाने रासायनिक शेतीला प्रोत्साहन देते की काय? असे वाटू लागते. त्याचे कारणही तसेच आहे. १ लाख ९१ हजार कोटी रुपये अनुदान प्रतिवर्षी रासायनिक खतांना आणि



औषधांना दिले जाते.

माती टिकेल तर शेती टिकेल आणि शेती टिकेल तर शेतकरी जगेल मातीला अधिकाधिक उपजाऊ बनवायचे असेल, तिची गुणवत्ता जोपासून भविष्यकाळ सुधारायचा असेल तर सेंद्रिय आणि गौ आधारित शेतीकडे सर्वांना वळावे लागेल. सूक्ष्म जीवशास्त्राचा अभ्यास करून मातीचे आरोग्य सुधारण्यासाठीचे आवश्यक उपचार करावे लागतील. जमिनीत मुळतः सुप्त अवस्थेत असलेले अन्नद्रव्य झाडांना उपलब्ध करून देण्याचे काम हे सूक्ष्मजीव करतात. त्यामध्ये नत्र स्थिरीकरण करणारे रायझोबियम, अझाटोबॅक्टर, अझोस्पेरिलम या प्रकारचे जिवाणू जमिनीत अमोनिकल फॉर्म्स स्वरूपातील नत्र झाडांना नायट्रेटस फॉर्ममध्ये उपलब्ध करून देतात. तसेच जमिनीत स्फुरद आणि पालाश विरघळणारे जिवाणू असतात, ते मुख्यतः या घटकांची उपलब्धता झाडांना करून देतात. ग्लोबल विकास ट्रस्टकडे सात ते आठ मातीचे शास्त्रज्ञ आणि अभ्यासक आहेत. शेतकऱ्यांना आमचे आवाहन आहे की सिरसाळा येथील संस्थेच्या कृषीकुल प्रशिक्षण केंद्रात येऊन सेंद्रिय आणि गौ आधारित शेतीची सखोल आणि परिपूर्ण माहिती आपल्याला घेता येईल. पूर्णपणे मोफत माहिती येणाऱ्या शेतकऱ्यांना दिली जाते.

जमिनीत असे काही जीवाणू आहेत की जे झाडावरती येणाऱ्या बुरशीजन्य रोगांना आटोक्यात आणण्यासाठी त्याचा वापर करू शकतो. त्यामध्ये ट्रायकोडर्मा, व्हर्टीसिलियम, मेटारॅझियम, सुडोमोनास इत्यादी अशा प्रकारच्या मित्र बुरशींचा वापर करून शत्रू बुरशींना चांगल्या प्रकारे नियंत्रणात आणू शकतो. सेंद्रिय शेतीकडे वळणे किंवा त्या मार्गावर सर्वांना एकाच वेळी घेऊन जाणे ही अशक्यप्राय बाब आहे हे आपण समजू शकतो, मात्र हळूहळू आपल्याला बदलावे लागणार आहे. हानिकारक ठरणाऱ्या रासायनिक प्रकारातील शेतीला हळूहळू जमेल तसे सेंद्रिय शाश्वत शेतीकडे घेऊन जावे लागेल. काळ्या मातीतून सोने उगवू शकणाऱ्या नव्या कल्पनांना मूर्त स्वरूपात आणावे लागेल. सेंद्रिय शेतीचे तंत्र आत्मसात करून अमलात आणावे लागेल. उत्तर भारतातील राज्यांमध्ये विशेषतः पंजाब मध्ये आपण पाहिले की, रासायनिक खतांचा आणि औषधांचा भडिमार करून हरितक्रांती घडवण्याचा प्रयत्न केला गेला. काही कालावधिकासाठी तो यशस्वीही झाल्याचे आभाशी चित्र निर्माण झाले. वास्तविक स्थितीत मात्र ते सर्व भयंकर असे कल्पनाचित्र रंगवले गेले आहे हे कालांतराने लक्षात येऊ लागले. रासायनिक अतिरेकामुळे तेथे गंभीर स्वरूपाचे आजार लोकांना होताहेत म्हणून की काय कर्करोगाशी आपला देश आणि देशातील नागरिक झुंजत आहेत. आजार झाल्यानंतर त्यावर उपचार शोधण्यापेक्षा तो आजार होऊच नये यासाठी दिशादर्शक पाऊल उचलणे गरजेचे आहे. यासाठी गौ आधारित सेंद्रिय आणि शाश्वत शेतीकडे निरोगी भविष्यासाठी पाहणे गरजेचे आहे. जागतिक मृदा दिनानिमित्त आपण सर्वजण संकल्प करूया मातीचे आरोग्य सुधारूया, सशक्त आणि सुदृढ देश बनवूया.




## जागतिक दिवस: महापरिनिर्वाण दिन

### महत्वाच्या घटना

१७६८ : एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१८७७ : द वॉशिंग्टन पोस्ट या वृत्तपत्राच्या प्रकाशनास सुरूवात झाली.
१८९७ : परवाना टॅक्सीकॅब सुरु करणारे लंडन हे जगातील पहिले शहर ठरले.
१९१७ : फिनलँड (रशियापासुन) स्वतंत्र झाला.
१९७१ : भारताने बांगलादेशला मान्यता दिल्यामुळे पाकिस्तानने भारताशी राजनैतिक संबंध तोडले.
१९७८ : स्पेनने सार्वमत चाचणीच्या कौलावरुन नवीन संविधान अंगीकारले.
१९८१ : डॉ. एस. झेड. कासिम यांच्या नेतृत्त्वाखाली 'पोलर सर्कल' या जहाजातून भारताची तुकडी आपल्या पहिल्या अंटार्क्टिक मोहिमेवर गोव्यातील मार्मागोवा बंदरातून रवाना झाली. ९ जानेवारी १९८२ रोजी रात्री साडेबारा वाजता अंटार्क्टिकावर पोचली. भारत हा अंटार्क्टिका मोहीम करणारा तेरावा देश बनला.
१९९२ : अयोध्येत कारसेवकांनी बाबरी मशिद पाडली. त्यामुळे उसळलेल्या दंगलीत सुमारे १,५०० लोक ठार झाले.
१९९७ : जपान च्या क्योटो मध्ये आंतरराष्ट्रीय हवामान परिषदच्या सम्मेलनाचे उद्घाटन.
१९९८ : बँकॉक मध्ये १३ वी आशियाई क्रीडा स्पर्धेला सुरुवात.
१९९८ : ह्यूगो चावेझ यांना व्हेनेझुएला चे राष्ट्रपती म्हणून निवडल्या गेले.
१९९९ : जर्मनीची लॉनटेनिसपटू स्टेफी ग्राफ हिला 'ऑलिम्पिक ऑर्डर' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.
२००० : थोर समाजसेवक बाबा आमटे यांना राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते केन्द्र सरकारचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला.
२००६ : ला नासाने मार्स ग्लोबल सर्वेयर ने काढलेले फोटो सार्वजनिक केले.
२००७ : ला ऑस्ट्रेलिया च्या शाळेमध्ये शीख विध्यार्थ्यांना कृपाण आणि मुस्लीम विध्यार्थ्यांना हिजाब नेण्यास परवानगी मिळाली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४२१ : हेन्री (सहावा) - इंग्लंडचा राजा (मृत्यू: २१ मे १४७१)
१७३२ : वॉरन हेस्टिंग्ज - भारताचा पहिला गव्हर्नर जनरल (मृत्यू: १८१८)
१८२३ : मॅक्समुल्लर - जर्मन विचारवंत (मृत्यू: २८ आक्टोबर १९००)
१८६१ : रेव्हरंड नारायण वामन तथा ना. वा. टिळक - कवी व लेखक (मृत्यू: ९ मे १९१९)
१८५३ : हरप्रसाद शास्त्री - संस्कृत विद्वान, शिक्षणतज्ञ, इतिहासकार (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९३१)
१९१६ : 'गंधर्व भूषण' जयराम शिलेदार (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९९२)
१९१७ : बास्किन-रॉबिन्स चे सहसंस्थापक इरब रोबिन्स यांचा जन्म. (मृत्यू: ५ मे २००८)
१९२३ : वसंत सबनीस लेखक व पटकथाकार (मृत्यू: १५ आक्टोबर २००२)
१९३२ : कमलेश्वर - पद्मभूषण पुरस्कार विजेते हिन्दी लेखक, पटकथालेखक, दूरदर्शनचे अतिरिक्त संचालक (मृत्यू: २७ जानेवारी २००७)
१९४५ : अभितेने शेखर कपूर यांचा जन्म.
१९४८ : भरतनाट्यम नृत्यांगना सुचेता भिडे-चापेकर यांचा जन्म.
१९८५ : भारतीय क्रिकेटपटू आर. पी. सिंग यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९२ : सीमेन्स कंपनीचे संस्थापक वर्नेर व्हॉन सीमेन्स यांचे निधन. (जन्म: १३ डिसेंबर १८१६)
१९५६ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (जन्म: १४ एप्रिल १८९१)
१९७१ : भारतातील भूविज्ञान अध्ययनाचा पाया घालणारे वैज्ञानिक कमलाकांत वामन केळकर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९०२)
१९७६ : क्रांतिसिंह नाना पाटील - स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, 'पत्री सरकार'चे (प्रति सरकार) संस्थापक आणि कम्युनिस्ट पक्षाचे खासदार (जन्म: ३ ऑगस्ट १९००)
१९९८ : ला परमवीर चक्र विजेता मेजर होशियार यांना वीरमरण.
२००९ : ला भारतीय अभिनेत्री बिना राय यांचे निधन.
२०१३ : नेल्सन मंडेला तथा 'मदीबा' - दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: १८ जुलै १९१८)
२०१५ : ला भारतीय चित्रपट अभिनेता राम मोहन याचे निधन.

# ईव्हीएम मशीन रूमवर २४ तास सीसीटीव्हीची नजर

अंबड । प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद निवडणूक 'स्ट्राँग रूम'ला त्रिस्तरीय अभेद्य सुरक्षा कवच; ईव्हीएम सुरक्षित स्ट्राँग रूम परिसरात सीसीटीव्हीची नजर आणि सशस्त्र जवानांचा २४ तास कडक पहारा राहणार आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी विजय चव्हाण यांनी दिली आहे अंबड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान प्रक्रिया अत्यंत भयमुक्त, शांततापूर्ण आणि पारदर्शक वातावरणात पार पडली. मतदानानंतर सर्व इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन्स येथील 'स्ट्राँग रूम'मध्ये अत्यंत सुरक्षित रित्या ठेवण्यात आल्या असून, या ठिकाणाला अभेद्य सुरक्षा पुरविण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली आहे. उमेदवारांच्या समक्ष सीलिंग प्रक्रिया पूर्ण मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सिद्धेश्वर धुमाळ, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री. मनोज उकिर्डे यांच्या उपस्थितीत स्ट्राँग रूम सील करण्यात आली. तत्पूर्वी, उपस्थित उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना स्ट्राँग रूमची पाहणी करू देण्यात आली आणि त्यांच्या पूर्ण समाधानानंतरच त्यांच्या समक्ष स्ट्राँग रूमला सील लावून ती बंदोबस्तासाठी उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आली.

अशी आहे त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था: स्ट्राँग रूमच्या सुरक्षेसाठी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे: अंतर्गत सुरक्षा स्ट्राँग रूमच्या अगदी जवळ, मधल्या बाजूस आणि समोरील बाजूस



एस.आर.पी.एफ. चे एक सेक्शन (सशस्त्र जवान) तैनात असून ते २४ तास पहारा देत आहेत. मध्य सुरक्षा: जिल्हा पोलिसांचे '१+८' चे गार्ड या ठिकाणी सज्ज आहे. बाह्य सुरक्षा बाह्य बाजूने स्थानिक पोलिसांचे ६ ते ८ अधिकारी व कर्मचारी यांची करडी नजर असून कोणालाही विनापरवाना प्रवेश निषिद्ध आहे. अत्याधुनिक सीसीटीव्ही आणि फायर सेफ्टी सुरक्षेच्या कारणास्तव आणि शॉर्ट सर्किटची शक्यता टाळण्यासाठी स्ट्राँग रूममधील अंतर्गत इलेक्ट्रिक सप्लाय पूर्णपणे खंडित करण्यात आला आहे. मात्र, बाह्य भागावर नजर ठेवण्यासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून त्याद्वारे २४ तास देखरेख सुरू आहे. तसेच, आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी घटनास्थळी फायर एक्सटिंग्विशर आणि नगर परिषदेचे फायर ब्रिगेडचे वाहन (अग्नि बंब) २४ तास तैनात ठेवण्यात आले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सतत नियंत्रण सुरक्षा व्यवस्थेवर पोलीस निरीक्षक आणि डीवायएसपी यांच्याकडून वेळोवेळी गस्त घातली जात आहे. तसेच निवडणूक विभागाचे कर्मचारी आणि स्वतः निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मी (विजय चव्हाण) व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नियमित भेटी देऊन सुरक्षेचा आढावा घेत आहोत. पारदर्शकता आणि विश्वासार्हता माननीय जिल्हाधिकारी महोदया आणि निवडणूक आयोगाच्या सर्व सूचनांचे या ठिकाणी तंतोतंत पालन करण्यात येत आहे. स्ट्राँग रूमच्या सुरक्षेत कोणताही निष्काळजीपणा होणार नाही, याची १००% खबरदारी घेण्यात आली आहे. पारदर्शकतेचा भाग म्हणून, जर कोणत्याही उमेदवाराला किंवा त्यांच्या प्रतिनिधीला स्ट्राँग रूमच्या बाह्य आवारात थांबून पाहायचे असेल, तर त्यांचीही तिथे थांबण्याची स्वतंत्र व्यवस्था प्रशासनाने केली आहे. तरी सर्व नागरिक व उमेदवारांनी प्रशासनावर विश्वास ठेवावा, ईव्हीएम पूर्णतः सुरक्षित आहेत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी विजय चव्हाण यांनी केले आहे.

## थोडक्यात

### शनिशिंगणापूर देवस्थानचे दोन कर्मचारी अटकेत

अहिल्यानगर। प्रतिनिधी

राज्यभर चर्चेत असलेला आणि विधिमंडळाच्या मागील अधिवेशनातही गाजलेला शनिशिंगणापूर देवस्थानच्या ॲप घोटाळ्याप्रकरणी अखेर सायबर पोलिसांनी कारवाई करत देवस्थानच्या दोघा कर्मचाऱ्यांना गुरूवारी (४ डिसेंबर) रात्री अटक केली. त्यांना आज (शुक्रवार) न्यायालयासमोर हजर केले जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सचिन शेटे, संजय पवार अशी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. ॲप घोटाळ्याप्रकरणी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर तो तपासासाठी येथील सायबर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सागर ढिकले या गुन्ह्याचा तपास करत आहेत. देवस्थानच्या अधिकृत परवानगीतील तीन ॲप व्यतिरिक्त आणखी चार बेकायदेशीर ॲप आढळून आले आहेत. या माध्यमातून जमा झालेल्या देणग्यांपैकी काही निधी दोघा कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात वळवला गेल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी देवस्थान विश्वस्त, कर्मचारी व पुजार्यांची चौकशी केली आहे. संशयास्पद व्यवहार झालेली बँक खाती तपासली असून ॲपच्या माध्यमातून पैशांची आवक-जावक कशी झाली, कोणाकडे निधी पोहोचला याची माहिती घेतली आहे दरम्यान सचिन शेटे व संजय पवार या दोघांकडे सायबर पोलिसांनी चौकशी केली व त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. त्यांच्या चौकशीत काय समोर येणार यावर गुन्ह्याचा तपास अवलंबून असणार आहे. उशिरा का होईना पण सायबर पोलिसांनी या गुन्ह्यात दोघांना अटक केली असल्याने पुढील तपासाला गती येणार आहे.

### जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन

जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला समितीवर नियुक्त शासकीय सदस्य, अशासकीय सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे. तसेच सर्वसामान्य नागरिकांचे ग्राहक हितासंबंधीत तक्रार असल्यास सदर बैठकीच्या दिवशी उपस्थित राहून आपला लेखी स्वरुपाचा अर्ज सादर करावा. तसेच नागरिकांना ग्राहक या संबंधाने काही अडचणी असल्यास त्याबाबत जालना जिल्ह्याचे संकेतस्थळ यावर ग्राहकांच्या तक्रारीसाठी पोर्टल उपलब्ध करुन दिलेले असून नागरिकांनी त्यांच्या समस्या या पोर्टलच्या माध्यमातून सादर करावयात, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जालना संरक्षण परिषदेचे सदस्य सचिव सविता चौधर यांनी केले आहे

## कोपरगाव, देवळाली, पाथर्डीसह नेवाशाचा सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर

अहिल्यानगर प्रतिनिधी

जिल्ह्यातील कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी नगरपालिका आणि नेवासे नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. तसेच सात नगरपालिकांमधील १२ नगरसेवकांसाठी हा निवडणुकीसाठी हा कार्यक्रम लागू राहणार आहे. या सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार चार नगराध्यक्ष आणि १०० नगरसेवकांचे भविष्य ठरणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्या दोन डिसेंबर रोजीच्या आदेशानुसार कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी नगरपालिका आणि नेवासे नगरपंचायत आणि सात नगरपालिकांमधील १२ प्रभागांच्या नगरसेवक पदाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी नव्याने पालिका निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यानुसार दहा



डिसेंबरपर्यंत माघारीची मुदत आहे. ११ डिसेंबरला चिन्ह वाटप होणार आहे. २० डिसेंबरला मतदान होणार आहे. २१ डिसेंबर मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. राज्यात सर्वत्र दोन डिसेंबर रोजी नगरपालिकांसाठी मतदान झाले. न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाने सर्वांचे निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे. गुरूवारी जिल्ह्यातील पालिका व नगरपंचायतीचा निवडणूक कशा पद्धतीने होणार यासाठीचा सुधारित कार्यक्रम जिल्हाधिकारी यांनी जाहीर केला. कोणत्याही प्रकारचे नामनिर्देशनपत्र नव्याने भरता येणार नाही. मात्र, ज्या उमेदवारांनी नामनिर्देशन यापूर्वी भरलेले आहेत. त्यांना १० डिसेंबरला दुपारी तीन वाजेपर्यंत माघार घेता येणार आहे. ११ डिसेंबर रोजी अत्यावश्यक असे चिन्ह वाटप करण्यात येणार आहे. कोपरगाव, पाथर्डी, देवळाली प्रवरा आणि नेवासे नगर पंचायतींमध्ये लोकांमधून नगराध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे. अनेक ठिकाणी बहुरंगी निवडणूक होत आहे. स्थानिक आमदार आणि लोकप्रतिनिधींच्या दृष्टीने नगराध्यक्ष आणि नगरपालिकेतील सत्ता महत्वाची ठरणार आहे. चार नगरपालिकांच्या सर्व जागा तर सात नगरपालिकांमधील काही प्रभागातील नगरसेवक पदाच्या निवडणुकीसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रमात समावेश आहे. कोपरगाव ३०, पाथर्डी २०, देवळाली प्रवरा २१, नेवासे १७ अशा ८८ जागेचा समावेश आहे. संगमनेर आणि शेवगाव प्रत्येकी ३, जामखेड २ तर श्रीरामपूर, राहुरी, श्रीगोंदे, शिर्डी प्रत्येकी एक जागा अशा १२ नगरसेवकपदासाठी निवडणूक होणार आहे.

## बस स्थानक चौकात बेवारस तरुणाचा मृतदेह आढळल्याने खळबळ

पारनेर ।तिनिधी

पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील सुपा बस स्थानक चौकात गुरुवारी सायंकाळी अंदाजे ३५ वर्षीय अनोळखी तरुणाचा मृतदेह बेवारस अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सुपा पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी नागरिकांना आवाहन केले आहे.

गुरुवारी सायंकाळी, सुपा बस स्थानक चौकात, वाळवणे गावाच्या बाजूला असलेल्या स्वागत कमानीजवळ नागरिकांची गर्दी जमलेली असल्याची माहिती रुग्णवाहिका चालक सादिक मकबूल सय्यद (रा. सुपा) यांना मिळाली. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता, अंदाजे ३५ वर्षीय एक तरुण बेशुद्धावस्थेत पडलेला दिसला. सय्यद यांनी तातडीने तेथील नागरिकांच्या मदतीने तरुणाला रुग्णवाहिकेतून सुप्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर तो मृत झाल्याचे घोषित केले. या घटनेनंतर सादिक सय्यद यांनी सुपा पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. घटनेची माहिती मिळताच सुपा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ना. हिगसे आणि पो. हे. कॉ. गोरे यांनी तात्काळ घटनास्थळी व रुग्णालयात भेट दिली. त्यांनी पंचनामा पूर्ण करून मृतदेह उत्तरणीय तपासणीसाठी पारनेर ग्रामीण रुग्णालयात पाठवला आहे. मृत तरुणाचे वय अंदाजे ३५ वर्षे असून, त्याचा रंग निमगोरा आहे. त

याने अंगात राखाडी रंगाचा शँडो स्वेटर, आतमध्ये फुल बाहीचा गुलाबी शर्ट आणि काळ्या रंगाची ट्रॅकस पॅन्ट परिधान केली आहे. पायात सँडल असून, त्याच्या छातीवर तीळ (लक्षण) आहे. वरील वर्णनाशी जुळणाऱ्या कोणत्याही व्यक्तीबद्दल माहिती असल्यास किंवा कोणी बेपत्ता असल्यास, संबंधित नागरिकांनी तातडीने सुपा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन सुपा पोलिसांनी केले आहे. पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ना. हिगसे हे पुढील तपास करत आहेत.

## अहिल्यानगर: अरणगाव- वाळुंज बायपासवर भरधाव ट्रॅव्हल्स आग; २७ प्रवासी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शुक्रवारी पहाटे पावणेचारच्या सुमारास भरधाव वेगात चाललेल्या एका ट्रॅव्हल्स बसने अचानक पेट घेतला. या घटनेत सुदैवाने सर्व प्रवासी सुरक्षीत राहिले आहेत. परंतु बस पूर्णपणे जळून खाक झाली. अरणगाव- वाळुंज बायपास रस्त्यावर बाबुड घुमट (ता. नगर) शिवारात ही घटना घडली. आगीची घटना कशामुळे घडली, याबाबत अजून स्पष्ट झाले नसून बस कोणत्या ट्रॅव्हल्स कंपनीची आहे, याचा शोध नगर तालुका पोलिसांकडून घेतला जात आहे.

पुणे- बीड (एमएच ०९ सीव्हीर ६३०९) ही ट्रॅव्हल्स बस पुण्याहून बीडच्या दिशेने चालली होती. या बसमध्ये एकूण २७ प्रवासी होते. अरणगाव- वाळुंज बायपास रस्त्यावरून ही बस चालली होती. अरणगाव जवळील बाबुड घुमट शिवारात पहाटे पावणेचारच्या दरम्यान बस भरधाव वेगात चालली असताना बसने अचानक पेट घेतला. बसने पेट घेतल्याचे लक्षात येताच चालक आणि बसमधील प्रवासी पटकन बसमधून उतरले. प्रवासी बसमधून उतरताच बसच्या आगीने भडका घेतला. त्यामुळे बस पूर्णपणे जळून खाक झाली. या घटनेची माहिती नगर तालुका पोलिसांना मिळताच पोलिस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलालाही पाचरण करण्यात आले. पोलिस आणि अग्निशमन दलाने बचाव कार्य करीत बसला लागलेली आग विझवण्यात आली

## ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा उत्साहात

लातूर। प्रतिनिधी

सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत लातूर केंद्रातून सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान, लातूर या संस्थेच्या दास्ताँ या नाटकाला प्रथम पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या नाटकाची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे.

१७ ते ३० नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत स्व. दगडोजीराव देशमुख सभागृह, लातूर येथे अतिशय जल्ल ोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण ११ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे लातूर केंद्रावरील अन्य निकाल असे आहेत. कलारंग, लातूर या संस्थेच्या टेडी बिअर या नाटकास द्वितीय पारितोषिक तसेच सुर्योदय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूर या संस्थेच्या उन्हातलं चांदणं या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. दिग्दर्शनः प्रथम पारितोषिक महेश सबनीस (नाटक- दास्ताँ), द्वितीय पारितोषिक संजय अयाचित (नाटक टेडी बिअर), तृतीय पारितोषिक ॲड. शैलेशगोजमगुंडे (नाटक-उन्हातलं चांदणं) प्रकाश योजना प्रथम पारितोषिक कृतार्थ कंसारा (नाटक उन्हालं चांदणं), द्वितीय पारितोषिक कल्याण वाघमारे (नाटक टेडी बिअर), तृतीय पारितोषिक प्रा. जितेन्द्र बनसोडे (नाटक घाट) नेपथ्य प्रथम पारितोषिक वाय. डी. कुलकर्णी (नाटक टेडी बिअर) द्वितीय पारितोषिक बालाजी म्हेत्रे (नाटक उन्हातलं चांदणं), तृतीय पारितोषिक पार्थ माने (नाटक-विठ्ठला) रंगभूषा :प्रथम पारितोषिक भारता थोरात (नाटक-इथे ओशाळला मृत्यू), द्वितीय पारितोषिक अमृता गलांडे (नाटक विठ्ठला) तृतीय पारितोषिक स्मिता अयाचित (नाटक टेडी बिअर) संगीत दिग्दर्शनः प्रथम पारितोषिक किरण जोशी (नाटक-टेडी बिअर), द्वितीय पारितोषिक नवनाथ सुगावकर (नाटक विठ्ठला) तृतीय पारितोषिक आनंद सरवदे (नाटक-घाट) वेशभूषाः प्रथम पारितोषिक योगेश पोटभरे (नाटक इथे ओश ाळला मृत्यू), द्वितीय पारितोषिक सुमित हसाळे (नाटक विठ्ठला) तृतीय पारितोषिक सचिन उपाध्ये (नाटक-उन्हातलं चांदणं) उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक अमृत महाजन (नाटक-दास्ताँ) व ईश्वरी वाघमारे (नाटक-टेडी बिअर), अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे सुधन्वा पत्की (नाटक-टेडी बिअर), प्रा. ज्योतिबा बडे (नाटक-इथे ओशाळला मृत्यू), ॲड. शैलेश गोजमगुंडे (नाटक-उन्हातलं चांदणं), प्रमोद कांबळे (नाटक-विठ्ठला), चैताली बडे (नाटक-उन्हातलं चांदणं), कल्पना महाजन (देशपांडे) (नाटक दास्ताँ), श्रुती सोनवणे (नाटक-विठ्ठला), अपर्णा गोवंडे (कुलकर्णी) (नाटक-अंतरछिद्र द ब्लॅक होल) स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून चंद्रशेखर गोखले, विवेक खेर आणि अंजली पटवर्धन यांनी काम पाहिले. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.


### कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangi@gmail.com PHno02483-271787

जा.क्रं.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१७६७ दिनांक १८/०९/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार काशिनाथ राणुबा लोंढे रा. पिरगैबवाडी ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे सलमा युसुफ अन्सारी रा. डोंगरी अंधेरी वेस्ट मुंबई यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ४८६७ दि. ०९/०९/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं २६३० दिनांकः ११/०९/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. सलमा युसुफ अन्सारी रा. डोंगरी अंधेरी वेस्ट मुंबई नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १६६८ मधील क्षेत्र ११८.९६ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- रस्ता
पश्चिम :- रस्ता
दक्षिण :- यासीन खॉ पठाण यांची जागा
उत्तरेस :- रस्ता

या वरील चतुःसिमा मधील ११८.९६ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/ तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

मुख्याधिकारी
नगरपंचायत घनसांवगी


## श्रीगोंद्यात 'सब घोडे बारा टक्के'चा मेळा

प्रशांत बाफना

अहिल्यानगर : श्रीगोंदा नगर परिषद निवडणूकीत येथील सर्वपक्षीय नेत्यांनी आपले खरे 'रंग' दाखवलेच नाही तर उधळलेही! त्यामुळे येथील उमेदवार, कार्यकर्ते आणि मतदारही पार गोंधळून गेले. मतदारांनी नेमके काय केले? मतदारांचा 'कौल' कुणाला? हे समजायला आता मतमोजणीपर्यंत थांबावेच लागेल. पण नेत्यांच्या 'कथनी और करनी'ची चर्चा आता शहरासह तालुक्यात जोरात सुरु आहे. येथील राजकारणाची अन्? राजकारण्यांची करणी अन्? कथनी आता समोर येवू लागली आहे. यातूनच एकमेकांना दूषणे देणे सुरु झाले आहे. मात्र 'सब घोडे बारा टक्के' असल्याचा अनुभव जसा आला तसाच 'हमाम मे सब नंगे' असल्याची प्रचिती एव्हाना समस्त श्रीगोंदेकरांना आली हे नक्की!

श्रीगोंदा नगर परिषदेच्या निवडणूकीत शहरातील राजकारण व राजकीय परिस्थिती सर्वपक्षीय नेत्यांच्या 'चलाखी'ने वेळोवेळी अतर्य वळणांवर गेली. निवडणूकीपूर्वी येथील मतदारांनी व राजकीय विश्लेषकांनी बांधलेले 'आडाखे' अक्षरक्षः मोडीत निघाले. येथील निवडणूकीत जिल्हा व राज्य स्तरावरील नेत्यांच्या सभा न होताही श्रीगोंद्याची निवडणूक राज्यात लक्षवेधी ठरली. यामागे नेत्यांच्या 'करामती' कारणीभूत ठरल्या हे आता समोर येवू लागले आहे.श्रीगोंदा नगर परिषद निवडणूकीत सर्वांनाच अचंबित करण्यात अपवाद वगळता सर्वपक्षीय नेत्यांनी 'भूमिका' वठवल्या हे वास्तव कोणीच नाकारु शकणार नाही. मतदान पार पडल्यानंतर आता नेत्यांना 'उपरती' झाली आहे. त्यातूनच स्वत:चे दोष व चुका लपविण्यासाठी दुस-यांवर 'खापर' फोडण्याचा प्रकार सुरु झाला आहे.याचा शेवट कशात व कशाने होईल हे पहावे लागणार आहे.

पाचपुतेंसाठी नागवडेंनी भोस यांचा खांदा वापरला! : राजेंद्र नागवडेंचे 'राजकीय सल्लागार' व साखर कारखान्याचे उपाध्यक्ष असलेल्या बाबासाहेब भोस यांनी नगर परिषद निवडणूकीत अत्यंत टोकाची भूमिका घेतली. भोस यांची ती भूमिका त्याच कारखान्याचे चेअरमन असणाऱ्या राजेंद्र नागवडेंनी कशी मान्य केली? यामागे मनोहर पोटेंना 'खिंडी'त गाठण्याचा नागवडेंचाच डाव होता हे लपून राहिले नाही. भोस यांना नागवडे यांची मदत नव्हती हे म्हणणे त्यामुळेच केवळ धाडसाचेच ठरले आहे.

त्यांच्या भूमिकेचे लॉजिक काय होते? : आ. पाचपुतेंच्या (भाजप) विरोधात मनोहर पोटेंना सोबत घेवून राष्ट्रवादीचा (घड्याळ) एकास एकच पॅनल करण्याच्या प्रयत्नांना सुरुवातीला 'खीळ' घालण्याचा 'उद्योग' करणा-यांमध्ये बाबासाहेब भोस, घनशाम शेलार, राजेंद्र नागवडे व साजन पाचपुते यांनीच महत्वपूर्ण भूमिका घेतली होती. या भूमिकेमागे 'लॉजिक' काय होते ? हे मात्र यापैकी कोणीच सांगितले नाही.

भोस यांना हटविण्याची हिम्मत नागवडे दाखवणार का? : मागील काही वर्षात कोणत्याही निवडणूकीत अत्यंत एकदिलाने राहणा-या राजेंद्र नागवडे- बाबासाहेब भोस यांची 'जोडी' नगर परिषद निवडणूकीतच का व कशी फुटली? यामागचे 'गुपित' समस्त श्रीगोंदेकरांना ज्ञात आहे. बाबासाहेब भोस आता साखर कारखान्याचे उपाध्यक्षपद स्वत:हून सोडणार की राजेंद्र नागवडे त्यांना दूर करणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

भोस यांना आघाडीचे तर कार्यकर्त्यांना पक्षांतराचे 'फ्री पास'! : अत्यंत निकटवर्तीय व विश्वासू असलेल्या बाबासाहेब भोस यांना 'आघाडी'त राहण्याचे स्वातंत्र्य व कार्यकर्त्यांना पक्षांतराचा 'फ्रि पास' देणा-या नागवडेंनी स्वत:च्या अधिपत्याखालील संस्थांमधील कर्मचा-यांना सक्तीने उमेदवा-या करायला लावून या कर्मचा-यांचा मार्गशीर्ष महिन्यात 'बळी' दिल्याची खुली चर्चा आता झडत आहे.

घनश्याम अण्णांचे रायगडावरून फक्त आदेश, त्यात मंदावली घड्याळाची टिकटिक! : शहरात ऐंशी सालापासून वास्तव्यास असलेले राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते घनशाम शेलार यांचा 'करिष्मा' फक्त नेत्यांच्यातच चालतो हे पुन्हा स्पष्ट झाले. शहरात त्यांचे संघटन जेमतेमच आहे. त्यातही 'फूट-तूट' झालीच. 'रायगडा'वरुनच त्यांचा 'कारभार' हाकला जात होता. तिथून 'आदेश' सोडायचे आणि मिडीयाला 'बाईट' द्यायचे एवढेच काम त्यांनी अधिक केले. त्यामुळे 'घड्याळा'ची 'टिकटीक' मंदावली. शेलारांच्या व्यक्तिगत विरोधामुळे अख्तर शेख, प्रशांत उबाळे यांच्यासारखे शहरात प्रभाव असलेले उमेदवार, कार्यकर्ते शिवसेनेच्या व आघाडीच्या 'तंबू'त गेले ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. तर काहींनी 'तुतारी'चा मार्ग निवडला.

महाविकास आघाडीचा बॅनर पाचपुतेंच्या शिडीसाठीच! : बाबासाहेब भोस यांनी ते महाविकास आघाडीच्या 'बॅनर' खाली निवडणूकीत उतरल्याचे भासवले. भोस आणि आघाडी हे 'प्यादे' कोणाची आहेत? याची मतदारांना शंका होतीच. 'अट्टाहासाने निवडणूकीत उतरलेल्या भोस यांचे 'उमेदवार' शेवटपर्यंत मैदानात टिकले नाहीत. परिणामी त्यांची 'दाणादाण'च झाली. निवडणूकीतून भोस यांनी काय 'अर्थ' साध्य केला हे शहराला मात्र समजून चुकले. पाचपुते समर्थक नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला चाल मिळावी यासाठी महाविकास आघाडीचा बॅनर भोस यांनी वापरला हेही लपून राहिले नाही.

नेत्यांच्या नाकावर टिच्चून 'त्या' साऱ्यांना नागवडेंनी मुद्दाम दिला फ्री हँड! : अनुराधा नागवडेंच्या विधानसभा निवडणूकीत राजेंद्र नागवडे यांच्या खांद्याला खांदा देवून अग्रभागी असलेले सतीश मखरे, एम.डी. शिंदे, प्रशांत गोरे, प्रवीण काळे, राजू गोरे, संदीप कोथिंबीरे यांनी थेट भाजपातच प्रवेश केला. यापैकी जवळपास सर्वांनाच उमेदवारीही दिली गेली. तर नागवडेंचेच निकटवर्ती असलेले ऋषिकेश बोरुडे, कुसुम दांडेकर, डॉ. दिपाली बोरुडे यांनी 'धनुष्यबाण' हाती घेतले. याशिवाय निसार बेपारी, संतोष कोथिंबीरे यासारखे शिलेदारही घड्याळ सोडून गेले. हे नागवडेंचे अपयशच म्हणावे लागेल. त्यांना संघटनेवर 'पकड' ठेवता आली नाही की त्यांनीच या साऱ्यांना 'फ्री हँड' दिला हे लपून राहिले नाही.

# जिल्ह्यातील चार तीर्थक्षेत्रावर माहितीपट तयार होणार

## राज्यातील ५० तीर्थक्षेत्रांसाठी चार कोटी ६२ लाख रुपयांचा निधी मंजूर

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राला लाभलेला ऐतिहासिक वारसा आणि अद्वितीय स्थापत्यशैलीमुळे महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या राज्यातील ५० तीर्थक्षेत्रांवर माहितीपटाची निर्मिती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ३ डिसेंबर २०२५ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या माहितीपटाच्या निर्मितीसाठी राज्य शासनाने ४ कोटी ६२ लाख रुपये इतक्या भरीव रकमेला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. त्यामध्ये बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील चिंचवण, अंबाजोगाई, माजलगाव तालुक्यातील मंजरथ, शुक्लतीर्थ लिमगाव या चार तीर्थ क्षेत्रांचा समावेश आहे. ज्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटन आणि सांस्कृतिक स्थळांना प्रोत्साहन मिळणार आहे.**

शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने या संदर्भात सविस्तर अध्यादेश निर्गमित केला आहे. माहितीपटात समाविष्ट करण्यात येणाऱ्या ऐतिहासिकदृष्ट्या व स्थापत्यदृष्ट्या अतिशय महत्त्वपूर्ण असणाऱ्या खालील ५० तीर्थस्थळांचा समावेश आहे.

पुणे जिल्हा : नागेश्वर मंदिर (खिरेश्वर, ता. जुन्नर), मोरया गणपती (वडगाव काशिमबेग, ता. आंबेगाव), रामलिंग मंदिर (शिरूर, ता. शिरूर), सोमेश्वर (सासवड, ता. सासवड), नारायणेश्वर (नारायणपूर, ता. पुरंदर).

सातारा जिल्हा : कात्रेश्वर (कातरखटाव) व सोमलिंग (गुरसाळे, ता. खटाव), केदारेश्वर (परळी) व गणपती (अंगापूर, ता. सातारा).

सांगली जिल्हा : वाटेगाव कऱ्हाड (वाटेगाव, ता. वाळवा), महादेव मंदिर (इरली) व महादेव मंदिर (कुची, ता. कवठेमहांकाळ)

रत्नागिरी जिल्हा : व्याडेश्वर (गुहागर, ता. गुहागर), संगमेश्वर (संगमेश्वर, ता. संगमेश्वर), कनकादित्य (कशेळी, ता. राजापूर) आणि शिव मंदिर-रामेश्वर (काळबादेवी, ता. रत्नागिरी),सिंधुदुर्ग : सातेरी (मातोंड/सातेरी, ता. वेंगुर्ला)

कोल्हापूर जिल्हा : महालक्ष्मी मंदिर (कोल्हापूर), पळसंबे (पळसंबे, ता. गगनबावडा) आणि ओंकारेश्वर (कोल्हापूर)

ठाणे जिल्हा : महादेव मंदिर (लोनाड, ता. भिवंडी)

उस्मानाबाद जिल्हा : माणकेश्वर (माणकेश्वर, ता. माणकेश्वर)

सोलापूर जिल्हा : माढेश्वरी (माढा, ता. माढा), शिव मंदिर, कोरवली; पंढरपूर शहर (ता. पंढरपूर)

बीड जिल्हा : विठ्ठल महादेव मंदिर (चिंचवण, ता. धारूर), लक्ष्मी-विष्णू मंदिर (मंजरथ, ता. माजलगाव), रामेश्वर-शुक्लतीर्थ (लिंबगाव, ता. बीड), बाराखंबी (अंबेजोगाई)

लातूर जिल्हा : सदाशिव (भूतामुगली) व नीळकंठेश्वर महादेव (निलंगा), विठ्ठल मंदिर, (पानगाव, ता. लातूर)

नांदेड जिल्हा : महादेव मंदिर (येवती, ता. धर्माबाद)

अहिल्यानगर जिल्हा : विठ्ठल रुक्मिणी मंदिर (श्रीगोंदा) व भवानी जगदंबा मंदिर (टाहाकरी, ता. अकोले)

जालना जिल्हा : खंडोबा बिलकेश्वर (चिंचखेड, ता. अंबड)

छत्रपती संभाजीनगर जिल्हा : सिद्धेश्वर मंदिर (अकोले), सिद्धेश्वर मंदिर (कनकावती, ता. कन्नड)

परभणी जिल्हा : त्रिदल/पिंगळेश्वर शिव मंदिर (पिंगळी, ता. परभणी)

हिंगोली जिल्हा : कानिफनाथ गड, (खैरी घुमट, ता. सेनगाव)

अमरावती जिल्हा : खंडेश्वर (नांदगाव खंडेश्वर)बुलढाणा जिल्हा : शिव मंदिर (धोत्रा नांदाई, ता. देऊळगाव राजा), वैष्णव मंदिर (कोठाळी, ता. पिंपळगाव राजा), सदाशिव पान ३ वर

## केकानवाडी शिवारात विनापरवाना दारू विक्री करताना दोघांना धारूर पोलिसांनी पकडले



किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये आसरडोह आडस रस्त्यावर केकानवाडी शिवारामध्ये दिव्या गार्डन समोर विनापरवाना देशी विदेशी दारूची विक्री करताना धारूर पोलिसांनी दोन जणांना पकडून मुद्देमाल व एक दुचाकी गाडी ताब्यात घेतली व दोन आरोपींना ताब्यात घेऊन विना परवाना देशी विदेशी दारू विक्री चा गुन्हा दाखल करून पुढील तपास धारूर पोलीस करत आहे

धारूर पोलिसांनी आसरडोह ते आडस रोडवर केकानवाडी शिवारात दिव्या गार्डन अँड रेस्टॉरंट समोर देशी व विदेशी दारू व बियर बार च्या बाटल्या विनापरवाना आर्थिक लाभाच्या दृष्टीने विकणाऱ्या दोन जणांना २२ हजार ५० रुपयाच्या दारूच्या मुद्देमालासह व ११०००० रुपये किंमतीच्या काळ्या रंगाच्या होंडा कंपनीची युनिकॉर्न गाडी गाडी क्रमांक ४४ ए डी ००३३ सह एकूण १३२०५० रुपयाचा मुद्देमाला सह आरोपी संजयकुमार आप्पाराव दराडे व बप्पासाहेब शेषराव पान ३ वर

## माजी नगरसेविका गयाबाई लक्ष्मणराव आळणे यांचे निधन



वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या वैद्यकीय, सामाजिक व राजकीय क्षेत्रात आदराचे स्थान असलेल्या माजी नगरसेविका सौ. गयाबाई लक्ष्मण आळणे (वय६५) यांचे पुणे येथील रुबी हॉस्पिटलमध्ये अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. आळणे कुटुंबातील ज्येष्ठ आणि सर्वांच्या प्रेमाचा आधारस्तंभ असलेल्या गयाबाई यांच्या निधनाने वडवणी परिसरात शोककळा पसरली आहे.

डॉ. सिताराम आळणे व डॉ. केशव आळणे यांच्या मातोश्री तसेच स्व. लक्ष्मणराव आळणे यांच्या पत्नी असलेल्या सौ. गयाबाई आळणे या धार्मिक, मूल्यनिष्ठ आणि परोपकारी वृत्तीच्या म्हणून ओळखल्या जात. आयुष्यभर समाजसेवेची मशाल पेटवून ठेवणाऱ्या या थोर व्यक्तिमत्त्वाने निधून जातानादेखील मानवतेची सर्वोच्च सेवा करत मरणोत्तर अवयवदानाचा अमूल्य निर्णय घेतला. आळणे परिवाराच्या संमतीने रुबी पान ३ वर

## निजामकालीन तहसील इमारत पाडून पाच महिने उलटले; काम ठप्प, चौकशीची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील ऐतिहासिक व निजामकालीन तहसील इमारत पाच महिन्यांपूर्वी पाडण्यात आली. मात्र त्यानंतर आजतागायत या ठिकाणी कोणतेही काम सुरू झालेले नाही. गुत्तेदाराकडून कोणतीच हालचाल न दिसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल भैया जाधव आणि शिवसेना उबाठा प्रमुख मुकुंद शिंदे यांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जुनी तहसील इमारत व्यवस्थित स्थितीत होती. दहापंधरा वर्षांपूर्वी लाखो रुपयांच्या खर्चातून त्याच इमारतीत उपविभागीय अधिकारी कार्यालय सुरू करण्यात आले होते. अशा इमारतीचे अचानक पाडकाम का करण्यात आले, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याशिवाय कोणतेही शासकीय बांधकाम सुरू करण्यापूर्वी 'कामाचा फलक' लावणे बंधनकारक असते, परंतु या ठिकाणी कोणताही फलक न लावता थेट पाडकाम करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान पाडकामानंतर पाच महिने उलटूनही जागेवर कोणतेही काम सुरू झालेले नाही. उलट ठिकाणी आडवे पत्रे लावल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. जागेवरून जाणाऱ्या वाहनांची सततची रेलचेल, उडणारा धूर व फुफाटा यामुळे पादचारी व व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित प्रशासन मात्र या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. या सर्व घडामोडींचा विचार करून काम ठप्प पान ३ वर

## पुणे येथे प्राचार्य देवराम सारोक्ते व पत्रकार अर्जुन मुंडे यांना संविधान गौरव पुरस्कार प्रदान



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव (बु.) येथील जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य देवराम गोगा सारोक्ते व दैनिक राज्य लोकतंत्रचे वडवणी तालुका प्रतिनिधी तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई वडवणी शाखेचे सचिव पत्रकार अर्जुन निवृत्ती मुंडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी,शेतकरी यांच्यासाठी तसेच शैक्षणिक,सामाजिक,पत्रकारिता या क्षेत्रात भरीव कार्य केल्याबद्दल दि बुद्धिस्ट विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या सेवा भावी संस्थेने प्रतिष्ठित असलेला राज्यस्तरीय ''संविधान गौरव'' पुरस्कार-२०२५ नुकताच जाहीर करण्यात आला होता.

हा पुरस्काराचे वितरण सोहळा ७५ व्या संविधान दिनाचे अमृत महोत्सव निमित्त दि बुद्धिस्ट विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य व बांधकामगार श्रमिक सेना यांच्या संयुक्त विद्यमाने गौरव संविधानाचा विशेष कार्यक्रमाचा आयोजन दि.३० नोव्हेंबर २०२५ रविवार रोजी ०२ ते ०६ या वेळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक,भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक पिंपरी-चिंचवड पुणे या ठिकाणी संपन्न झाला. पान ३ वर

## २४१ कोटीच्या भूसंपादन घोटाळ्या विषयी एसआयटी नेमा - मनसे

**बीड । प्रतिनिधी**

**प्रशासनातील अधिकाऱ्यांनी काही लोकांना हाताशी धरुन संगनमताने शासनालाच २४१ कोटी रुपयांचा चूना लावल्याचे दिसुन येत असूनही पोलीस प्रशासन मात्र शांत आहे. यात प्रशासनातील अधिकारी, लाभार्थी यांच्यावर संघटीत गुन्हेगारीची कलमे लावली पाहिजेत व विशेष तपास पथक नेमुन दोषींवर कार्यवाही करावी अशी मागणी मनसे च्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदणात म्हटले आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, भूसंपादन कार्यालयात लवाद / अपिल प्रकरणात जुन्या तारखा टाकून तात्कालीन जिल्हाधिकाऱ्याचे नाव, पदनाम व स्वाक्षरी नमूद करुन बोगस आदेश निर्गमित करुन करोडो रुपयांचा अपहार झाला आहे. यात प्रमुख दोषी म्हणुन सहाय्यक महसुल अधिकारी संजय हांगे जरी असला तरी तात्कालिन जिल्हाधिकारी व या प्रकरणातील लाभार्थी सुध्दा तेवढेच जवाबदार व दोषी आहेत. या प्रकरणात हांगे सह दोघे जरी अटकेत असले तरी इतर फरार आरोपींना पोलीस कधी पकडणार जे राजरोस पणे बीड शहरात फिरत आहेत. हे पोलीसांना दिसत नाही का? या मावेजा वाटप प्रकरणातील अनेक लाभार्थी टोळी ने लाखोचे व्यवहार केले असुन यातील लाभार्थी टोळी ही आरोपी करावे हा सर्व घोटाळा ठरवून संगनमताने केला आहे. तेव्हा तात्कालिन जिल्हाधिकारी ते शेवटचा लाभार्थी यांची संपूर्ण चौकशी करुन याबाबत विशेष पथक नेमण्यात यावे आणि फरार अधिकारी व वकील यांना १५ दिवसात अटक करुन यांच्या संपूर्ण संपत्तीची चौकशी करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेने च्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना करण्यात आली त्यावेळी मनसे चे माजी जिल्हाध्यक्ष वैभव काकडे, उपजिल्हाध्यक्ष सदाशिव बिडवे, विरेंद्र भालेकर, सुरज जोगदंड, हरिभाऊ खोपडे, गोरख खेडकर, विकास कडिले, आदर्श तरकसे, कृष्णा वाणी सह महाराष्ट्र सैनिक होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) अल्पसंख्यांक विभाग शहराध्यक्षपदी शेख शाकेर यांची नियुक्ती




बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अल्पसंख्यांक विभागाच्या शहराध्यक्ष पदी शेख शाकेर यांची निवड करण्यात आली असून शहरातील अल्पसंख्यांक समाजात याचा मोठ्या उत्साहात व आनंदात स्वागत करण्यात आले. शेख शाकेर हे समाजातील एक सक्रिय, प्रामाणिक व जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव लढणारे युवा नेतृत्व म्हणून ओळखले जातात. पक्षाच्या वाढीसाठी व जनतेच्या हितासाठी कार्य करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

अजितदादा पवार,मा.मंत्रीआ धनंजय मुंढे,आ.विजयसिंह पंडित, अड.राजेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनात जिल्हा अध्यक्ष निजाम शेख, राज्य प्रवक्ता भागवत तावरे, मुजीब भाई, वकील साहेब, काझा बॉस, अरिफ खान, जानी मामू, फारुख शेख, पान ३ वर

## दत्त संस्थान, बालाघाट येथे दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न



बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र दत्त संस्थान, बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे दत्त जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साह, श्रद्धा आणि भक्तिभावाने संपन्न झाला. सद्गुरु शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या कृपाशिर्वादाने तसेच दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा भव्यदिव्य पद्धतीने पार पडला.

कार्यक्रमाअंतर्गत दुपारी बारा वाजता दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त श्री दत्तांच्या पान ३ वर

## पत्रकार अविनाश कदम यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर



म्हसोबावाडी। प्रतिनिधी

मराठा सेवा संघ प्रणीत तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने प्रथमच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जिजाऊ माँसाहेब आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमातर्फे यावर्षीचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार दै लोकमत व मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे यांनी दिली.

अविनाश कदम हे दैनिक लोकमत व मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तसेच मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष आहेत. गेल्या १७ वर्षांपासून पत्रकारितेत सक्रिय असलेल्या कदम यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, धार्मिक या विविध क्षेत्रांतील गोरगरीब व सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या दखलमध्ये हा पुरस्कार देण्यात आला आहे.आयोजन पान ३ वर

## राज्यव्यापी 'शाळा बंद' आंदोलनाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

### जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्री आणि शिक्षण मंत्र्यांना दिले निवेदन!



बीड । प्रतिनिधी

राज्यातील जि. प.,खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या राज्य पातळीवरील संघटना व त्यांची समन्वय समितीच्या राज्यातील शिक्षकांना लागू करण्यात टीईटीची सक्ती रद्द करा. या प्रमुख प्रमुख मागणीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी राज्यभर पुकारलेल्या 'शाळा बंद' आंदोलनाला बीड जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील जिल्हा परिषद, खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा देत आंदोलनात सहभाग नोंदविला. शासन आणि प्रशासनाच्या दडपशाहीकडे दुर्लक्ष करत आंदोलन यशस्वी झाल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून आले.काही ठिकाणी शिक्षकांनी काळ्या फिती बांधून शासनाचा निषेध नोंदविला.

याबाबत अधिक माहिती अशी की, राज्यात २०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी -सक्ती रद्द करावी,संच मान्यते संबंधीचा १५ मार्च ,२०२४ चा शासन आदेश रद्द करुन जुने निकष लागू करावेत, हजारो शाळा बंद पाडणारे शिक्षक व विद्यार्थ्यांचे देखिल नुकसान करणारे, शिक्षक समयोजनाचे धोरण रद्द करावे, जि. प. शिक्षकांना स्थगित केलेल्या पदोन्नती द्याव्यात, १०-२०-३० आश्वाशित प्रगती योजना लागू करावी, शिक्षण क्षेत्रातील कंत्राटी करण थांबवावे, या व अनेक प्रलंबित-दुर्लक्षित मागण्यांकडे शासन-प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज एक दिवस शाळा बंद आंदोलन करण्यात आले. सदरील आंदोलन पान ३ वर

## दिंद्रुड नगरीत दत्त जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा



दिंद्रुड । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे श्रीदत्त जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरा लगत छोटेखानी असलेल्या महाकाली मंदिरात दत्तजयंती च्या निमित्ताने (दि.०४) गुरुवारी श्री दत्त जन्मोत्सवाचे आयोजन मंदिराचे पुजारी सतिश महाराज पांचाळ यांनी केले होते. यावेळी शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

येथील महाकाली देवीच्या मंदिरात मित्ती मार्गशीर्ष शु.१४ शके १९४४ गुरूवार रोजी सकाळी रांगोळी, फुलांची सजावट करुन, श्री. दत्तात्रेय व महाकाली देवीचा महाअभिषेक, पुजा केल्यानंतर दुपारी बारा वाजता महाआरती व एक वाजता महाप्रसादाला सुरूवात करण्यात आली. सायंकाळी सहा वाजताच श्रीदत्त जन्माला येथील भाविक भक्तांनी अत्यंत श्रद्धेने फुलांची उधळण केली. दिगांबरा दिगांबरा, श्रीपाद पान ३ वर


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातून मुंबईला जाणे लंडन, थायलंडपेक्षाही महाग; विमान प्रवासाचे दर गगनाला भिडले, ६१ हजार

**पुणे । प्रतिनिधी**

इंडिगो कंपनीने अचाकन आपल्या फ्लाईट रद्द केल्याने देशातील विविध महत्त्वाच्या विमानतळाची अवस्था बस स्टँडसारखी झाली असून प्रवाशांची मोठी गर्दी विमानतळावर पाहायला मिळत आहे. इंडिगाने पत्रक जारी करत प्रवाशांची माफी देखील मागितली आहे. मात्र, अचानक विमानसेवा खंडीत झाल्याने पुणे (पिंपिश), मुंबई, कोलकाता, दिल्ली, बंगळुरू येथील प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला असून या विमातळावरुन दुसरीकडे मार्गस्थ होणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली आहे. त्यातच, पुण्याहून मुंबई, दिल्ली आणि बंगळुरूला जाणाऱ्या विमानांच्या तिकिटांचे दर गगनाला भिडल्याचं पाहायला मिळत आहे. पुणे ते मुंबई विमान प्रवास करण्यासाठी तब्बल ६१ हजार रुपये प्रवाशांना मोजावे लागत असल्याचं दिसून येतं. त्यामुळे, प्रवाशांकडून संताप व्यक्त करण्यात आला आहे.




इंडिगो एरलाईन्स कंपनीच्या ऑपरेशन समस्यांमुळे इतर विमान कंपन्यांनी आपल्या तिकीट दरात अचानक वाढ केली. त्यानुसार, पुणे ते मुंबई विमानाचे तिकीट ६१ हजार रुपयांवर पोहोचले आहे. तर, पुणे ते दिल्ली विमानाचे तिकीट २७ हजार आणि पुण्याहून बंगळुरूसाठी ४९ हजार रुपये प्रवाशांना मोजावे लागत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, मुंबईहून लंडनला जाण्यासाठी किमान प्रिमियम इकॉनॉमीचे तिकीट ५० हजार ते ७० हजार रुपयांपर्यंत आहेत. तर, मुंबईहून थायलंडसाठी १५ ते ३० हजार रुपयांपर्यंत विमान भाडे आकारले जाते. मात्र, इंडिगोच्या विस्कळीत विमानसेवेमुळे पुणे ते मुंबई विमानाचे तिकीट चक्क ६१ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

सलग चौथ्या दिवशी इंडिगो कंपनीला ऑपरेशनल समस्यांशी गंभीरपणे झुंजावे लागत असून प्रवाशांना त्याचा मोठा फटका बसत आहे. विमान उड्डाणाची संख्या कमी झाल्यामुळे इतर विमान कंपन्यांची तिकिटं मात्र चौपट दराने विकली जात आहेत.

### इंडिगोकडून प्रवाशांची माफी

दिल्ली विमानतळावरून ५ डिसेंबर २०२५ रोजी (अएङ) निघणाऱ्या सर्व इंडिगो देशांतर्गत विमानांची उड्डाणे रात्री ११.५९ पर्यंत रद्द करण्यात आली आहेत. या अनपेक्षित निर्णयाचा गंभीर फटका बसलेल्या आमच्या सर्व मौल्यवान प्रवासी, ग्राहकांची आणि भागधारकांची आम्ही मनापासून माफी मागतो, असे इंडिगोने जारी केलेल्या पत्रात म्हटलं आहे.

देशभरातून इंडिगोची तब्बल ६०० हून अधिक विमाने आज रद्द करण्यात आली आहेत. त्यामध्ये राजधानी दिल्लीतून आज रात्री ११.५९ वाजेपर्यंत इंडिगोचे एकही विमान उड्डाण होणार नाही, असे पत्रच कंपनीने जारी केले आहे. दरम्यान, रद्द होणाऱ्या विमानांची ही संख्या गेल्या दिवसांपेक्षाही जास्त असल्याने प्रवाशांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. त्यामुळे, प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

# पुणे विभागातील पदवीधर, शिक्षक मतदारसंघांच्या याद्या प्रसिद्ध; २.७२ लाख पदवीधर, ४४ हजार शिक्षक नोंदणी

**पुणे । प्रतिनिधी**

विभागातील पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या नव्याने मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध केलेल्या प्रारुप मतदार यादीनुसार पुणे विभागात २ लाख ७२ हजार ६१ पदवीधरांची तर ४४ हजार २३३ शिक्षक मतदारांची नोंदणी झाली आहे. या २०२५ च्या कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार यादीनुसार पदवीधर मतदार संघासाठी पुणे जिल्ह्यात ५४ हजार ८१० मतदार नोंदणी, सातारा-३५ हजार ८७९, सोलापूर ३० हजार ४७२, कोल्हापूर- ८० हजार १८०, सांगली-७० हजार ७२० अशी एकूण २ लाख ७२ हजार ६१ इतकी नोंदणी झाली आहे.

तर शिक्षक मतदार संघासाठी पुणे-९ हजार ७७८, सातारा ८ हजार ४९२, सोलापूर-११ हजार १९८, कोल्हापूर ८ हजार ६३१ व सांगली- ६ हजार १३४ अशी एकूण ४४ हजार २३३ मतदा२०२० मध्ये पदवीधर मतदार संघासाठी ४ लाख २० हजार ८९६



इतकी तर शिक्षक मतदारांची ७२ हजार १९० इतकी नोंदणी होती. गेल्या निवडणुकीपेक्षा यावर्षी आतापर्यंत कमी मतदार नोंदणी झाली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी मतदार नोंदणीची जागृती करुन पात्र मतदारांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले आहे. रांची नोंदणी झाली आहे.


दावे व हरकतींचा कालावधी संपल्यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी तयार करणे व छपाईची कार्यवाही करण्यात येईल. पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या यादीची अंतिम प्रसिद्धी १२ जानेवारी २०२६ रोजी केली जाणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत १८ डिसेंबर २०२५ पर्यंत मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या पदनिर्देशित अधिकारी किंवा संबंधित विधानसभा मतदार संघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे दावे व हरकती दाखल करता येतील. नवीन नाव नोंदणीचा दावा दाखल करण्यासाठी पदवीधरांना नमुना क्रमांक १८ व शिक्षकांना नमुना क्रमांक १९ द्वारे याच कालावधीत दावा दाखल करता येईल, प्रारुप मतदार यादीतील नावांबाबत आक्षेप असल्यास नमुना क्रमांक ७ व यादीतील नोंदीमध्ये दुरुस्तीसाठी नमुना क्रमांक ८ दाखल करता येईल,

# टाकाऊ वस्तूंचा सुयोग्य वापर करत बदलला परिसराचा चेहरा मोहरा

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील कचरा संवेदनशील ठिकाणांचे रूपांतर करण्यासाठी हाती घेतलेल्या टाकाऊ वस्तूंच्या कलात्मक पुनर्वापर उपक्रमामुळे परिसराचा चेहरामोहरा बदलत आहे. भोसरी प्रभाग क्रमांक ०७ भारत गॅस एजन्सी नजीक, विकास कॉलनीतील जागेचे सौंदर्यीकरण नुकतेच करण्यात आले असून, ही कलाकृती स्थानिक नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरली आहे.



### पिंपरी चिंचवड शहरात वेस्ट टू आर्ट उपक्रमासाठी महापालिकेचा अभिनव उपक्रम

पिंपरी चिंचवड शहरात महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहा.आयुक्त अमित पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली वेस्ट टू आर्ट हा उपक्रम राबविण्यात येत आहे. इ क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे यांच्या नेतृत्वात प्रभाग क्रमांक ०७ अंतर्गत इ क्षेत्रीय कार्यालयाने राबवलेल्या या उपक्रमात जुने टायर, फाटलेली पोस्टर्स, जुन्या लाकडी फळ्या, बांबू, जुन्या विटा अशा टाकाऊ वस्तूंना नवीन कलात्मक रूप देण्यात आले. रंगीबेरंगी रांगोळी, स्वच्छतेचे संदेश देणारे फलक आणि आकर्षक मांडणीमुळे या जागेचा संपूर्ण कायापालट झाला आहे. टाकाऊ कचऱ्यापासून कलात्मकता हा उपक्रम पिंपरी चिंचवड शहरासाठी एक प्रेरणादायी पाऊल ठरत आहे.

वेस्ट टू आर्ट उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सहा.आरोग्य अधिकारी राजेश भाट, मुख्य आरोग्य निरीक्षक अतुल सोनवणे, आरोग्य निरीक्षक गौरव गायकवाड तसेच अन्य महापालिका अधिकारी व कर्मचारी यांनी यासाठी विशेष योगदान दिले.

# नारायणगावात भीषण बिबट्या हल्ला! युवक थोडक्यात बचावला

**नारायणगाव । प्रतिनिधी**

नारायणगाव येथील साकारनगरीजवळ असलेल्या पिराच्या वस्तीत राहत असलेल्या युवकावर बिबट्याने हल्ला करून त्याला जखमी केले. केवळ दैव बलवत्तर म्हणून हा युवक बिबट्याच्या हल्ल्यातून बचावला. दरम्यान या जखमी युवकावर नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वनविभागाला घटनेची माहिती मिळते त्यांनी युवक राहत असलेल्या वस्तीजवळ बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या युवकाचे नाव तनिष नवनाथ परदेशी आहे.

याबाबत समजलेली माहिती अशी की, पीर वस्ती जवळ राहत असलेला हा युवक गुरुवारी (दि. ४) सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास घराजवळ फिरत असताना बिबट्याने मागच्या बाजूने येऊन त्याच्यावर हल्ला केला. बिबट्याच्या हल्ल्यात त्याच्या मांडीला जखम दोन ठिकाणी झाली आहे. दरम्यान बिबट्याचा हल्ला झाल्यावर हा युवक बिबटयाच्या भीतीने १०० मीटर अंतरावर असलेल्या गाजर गवतात जाऊन लपून बसला व त्याने आपल्या मित्राला फोन करून घटनेची माहिती सांगितली. मित्राला सुरुवातीला वाटले हा आपली मस्करी करतोय, परंतु त्याचा रडण्याचा आवाज आल्याने मित्र तातडीने त्याच्या घरी आला व आईला विचारले तनिष कुठे आहे? तो बाहेर आहे असे आईने सांगितले. मग मित्राने लगेच तनिषला फोन लावला व तू कुठे आहेस, असे विचारल्यावर घराच्या बाजूला आंब्याजवळ असलेल्या गाजर



गवतात मी लपून बसलोय असे त्याने सांगितते. गाजरगवतामधून त्यांनी मोबाईलची बॅटरी लावली. मोबाईलचा टॉर्च लावल्यावर त्याचा मित्र त्या गाजर गवतात गेला व त्याला बाहेर आणले. तो प्रचंड घाबरलेला होता. त्याला तातडीने नारायणगावच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केले. दरम्यान घटनेची माहिती समजतात तालुक्याचे आमदार शरद सोनवणे व नारायणगावचे उपसरपंच बाबू पाटे यांनी दवाखान्यात जाऊन या युवकाची विचारपूस केली. या युवकावर तातडीने उपचार करण्याच्या सूचना आमदार शरद सोनवणे यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या. दरम्यान तनिष परदेशी ज्या पीर वस्ती जवळ राहत आहे, त्या वस्तीजवळ चारी बाजूंनी ऊस आहे. त्यामुळे तेथे बिबट्याचे वास्तव्य अनेक दिवसापासून असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. वन खात्याने या ठिकाणी बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावलाय, परंतु बिबट्या काही पिंजऱ्यात येत नाही, असेही नागरिकांचे म्हणणे आहे. पिंजरा पूर्णपणे उघडा व लोक वस्ती जवळ ठेवल्यामुळे त्याच्यात बिबट्या कसा येणार असा सवाल स्थानिक नागरिकांनी केला आहे. वनविभागाचे वनक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता ते म्हणाले की, या परिसरामध्ये बिबट्या असल्याचे स्थानिक नागरिकांनी आम्हाला सांगितल्यावर वनखात्याने तात्काळ त्या ठिकाणी पिंजरा लावलेला आहे. वस्तीजवळ लावलेला पिंजरा स्थानिक नागरिकांच्या सुचनेनुसार दुसऱ्या सोयीच्या ठिकाणी लावण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

# मंडलाधिकारी एक लाखाची लाच घेताना लाचलुचपतच्या

**पुणे । प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील निगुडघरच्या मंडलाधिकारी रूपाली अरुण गायकवाड (वय ४०) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी (दि. ४) एक लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

या प्रकरणी गायकवाडविरुद्ध भोर पोलिस ठाण्यात भष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदाराकडे दीड लाख रुपयांची लाच मागितल्यानंतर प्रत्यक्षात एक लाख रुपये स्वीकारताना ही कारवाई केली आहे. तक्रारदार हा २३ वर्षीय व्यावसायिक असून, त्याने १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ या कालावधीसाठी २०० बास माती वाहतुकीचा परवाना तहसील कार्यालय भोर येथून घेतला




होता. त्यासाठी एक लाख २६ हजार २३० रुपये रॉयल्टीपोटी भरले होते. तक्रारदाराच्या परवान्यातील गाड्यांमधून माती वाहतूक सुरू असताना आरोपी मंडलाधिकाऱ्यांनी ३० नोव्हेंबरला गाड्या अडवून पुढील वाहतुकीसाठी दीड लाख रुपयांची लाच मागितली. पैसे न दिल्यास वाहतूक बंद ठेवण्याची धमकी देत अडवलेल्या गाड्या सोडल्या, असे तक्रारीत नमूद होते.

त्यानंतर आरोपी अधिकारी वारंवार तक्रारदाराला त्यांच्या कार्यालयात बोलवत असल्याने तक्रारदाराने ३ डिसेंबरला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी पडताळणी केली असता, गायकवाड यांनी तक्रारदारास भोर शहराबाहेरील अभिजित मंगल कार्यालयाजवळ भेटण्यास बोलावून पुन्हा एक लाख रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा रचण्यात आला. सायंकाळी ५ वाजता भोरेश्वरनगर रस्ता येथे आरोपी लोकसेविकेने तक्रारदाराकडून एक लाख रुपये लाच स्वीकारताच पंचासमक्ष तिला अटक करण्यात आली. ही कारवाई पोलिस निरीक्षक सुहास हट्टेकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

## ‘शांततापुणेकर वाचत आहेत’: ९ डिसेंबरला पुणे शहर एका तासासाठी शांत; वाचन संस्कृतीसाठी अनोखा उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे पुस्तक महोत्सवानिमित्त नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पुस्तके वाचून सहभाग नोंदवावा, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यापीठांचे कुलगुरू, संस्थाचालक व प्राचार्य यांच्या बैठकीत ते बोलत होते. ‘शांतता पुणेकर वाचत आहेत’ हा विशेष उपक्रम ९ डिसेंबरला होत असून सकाळी ११ ते दुपारी १२ या एका तासात संपूर्ण पुणे शहर शांततेत वाचन करणार आहे. पुणेकरांनी या उपक्रमात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन पाटील यांनी केले. या उपक्रमातून वाचनसंस्कृतीला अधिक चालना मिळेल, असेही ते म्हणाले.

महोत्सवाचे प्रमुख संयोजक राजेश पांडे यांनी कार्यक्रमातील विविध उपक्रमांची माहिती दिली.



राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे संचालक युवराज मलिक यांनी पुणे हे ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट न म्हणता पश्चिमेकडील नालंदा म्हणावे असे गौरवोद्गार काढले. कुलगुरूंनी मान्यवरांचे स्वागत केले. उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर यांनी वाचन उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर, डॉ. ज्योती भाकरे, रवींद्र शिंगणापूरकर, डॉ. नितीन घोरपडे, देविदास वायदंडे, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. संगीता जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. संजय चाकणे यांनी केले.

# उच्चशिक्षित तरुणाने ज्वेलर्सला लावला चुना; ‘अशी’ करायचा सोन्याच्या अंगठ्यांची अदलाबदल

**पुणे । प्रतिनिधी**

पैशाची कमतरता नसलेल्या एका उच्चशिक्षित तरुणाला चोरीचे व्यसन जडल्याचे विमानतळ पोलिसांच्या तपासातून उघडकीस आले आहे. सराफी दुकानात खरेदीचा बहाणा करून बनावट अंगठी ठेवत दुकानातील अस्सल सोन्याची अंगठी चोरण्याची त्याची पद्धत अखेर सीसीटीव्हीच्या मदतीने पोलिसांच्या हाती लागली. याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी त्याला जेरबंद केले. सैफ दिलीप बेळगावकर (वय २९, रा. केदारेनगर, वानवडी, मूळ रा. सांगली) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत २१ वर्षीय तरुणाने विमानतळ पोलिसांत फिर्याद दिली. २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजता विमाननगर येथील नामांकित ज्वेलर्समध्ये ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी २६ नोव्हेंबर रोजी दुकानात काम करीत असताना एक रिंग बनावट असल्याचे मॅनेजर यांनी निदर्शनास आणून दिले. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले, असता २३ नोव्हेंबरला एक तरुण पांढरी हुडी व काळी पँट घालून दुकानात येताना दिसला. रिंग पाहताना तो फोनवर बोलत असल्याचे भासवत ट्रे मधील ८ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरून तिथे स्वतःजवळील खोटी अंगठी ठेवून गेल्याचे दिसून आले. याबाबत गुन्हा दाखल होताच विमानतळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गोविंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नितीन राठोड यांच्या पथकाने सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा माग काढला. त्यादरम्यान औंधमधील एका सराफी दुकानात तो येणार असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यावेळी सापळा रचून पथकाने बेळगावकर याला ताब्यात घेतले. उपनिरीक्षक नितीन राठोड, मनोज बरुरे, अंमलदार योगेश थोपटे, ज्ञानेश्वर आवारी, रूपेश पिसाळ, शैलेश नाईक, दादासाहेब बर्डे, हरिप्रसाद पुंडे यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.

# हिंगणीबेर्डीत अखेर बिबट्या जेरबंद; आठ दिवसांच्या मोहिमेला यश!

**दौंड । प्रतिनिधी**

हिंगणीबेर्डी (ता. दौंड) येथे बिबट्याला पकडण्यात अखेर वन विभागाला यश आले आहे. शुक्रवारी (दि. ५) पहाटेच्या सुमारास बिबट्या अखेर पिंजऱ्यात जेरबंद झाल्याची माहिती तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांनी दिली.

दौंड तालुक्याचा पूर्व भागात प्रथमच बिबट्या जेरबंद होण्याची घटना घडली. हिंगणीबेर्डी गावातील कामठे, गोधडे वस्ती येथे हनुमंत गोधडे यांच्या वस्तीलगत बिबट्या सापडला. या बिबट्याचे पाच ते सहा वर्ष वय असल्याची माहिती वन अधिकाऱ्यांनी दिली. तालुक्याच्या पूर्व भागात मागील काही दिवसापासून बिबट्याचा वावर वाढला आहे.

रावणगावला बिबट्याने अडीच तास ठिय्या मांडला होता. स्वामी चिंचोली, खडकी येथे खुलेआम दर्शन तर मळद, बोरीबेल, आलेगाव परिसरात पाळीव प्राण्यांवर हल्ले करत जनावरे ठार मारल्याच्या अनेक घटना घडल्या होत्या. या पार्श्वभूमीवर हिंगणीबेर्डी परिसरात मागील आठ दिवसापासून वन विभागाने पिंजरा लावला होता. यामध्ये बिबट्या अडकला.

दौंड तालुक्यात बिबट्याच्या वावराने व वाढत्या हल्ल्याने आमदार राहुल कुल यांनी वन विभागाला तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते. सहाय्यक उपवनसंरक्षक (पुणे) महादेव मोहिते यांनी मागील आठवडाभरापूर्वी तालुक्याला यासाठी पिंजरे उपलब्ध करून दिले होते. तालुक्यात जवळपास १४ पिंजरे लावण्यात आले असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात आले

हिंगणीबेर्डीत बिबट्या पकडण्यासाठी वन विभागाला प्रवीण ढवळे, शंकर जाधव, विनोद भोसले, विशाल कामठे, अमोल कामठे, समीर गोधडे या ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. बिबट्या पकडल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांच्य मार्गदर्शनाखाली वनपाल मनीषा उघडे, वनरक्षक शुभांगी मुंढे, गोकुळ गवळी, वन कर्मचारी शरद शितोळे, बाळु अडसूळ यांनी यासाठी रात्रंदिवस काम करत सहकार्य केले.

# शीतल तेजवाणीच्या घरी पुणे पोलिसांची झाडाझडती, महत्वाचे पुरावे हाती लागणार?

**पुणे । प्रतिनिधी**

शीतल तेजवानीच्या पिंपरीतील माहेरच्या घरी पुणे पोलीस पोहोचले. पोलिसांकडून इथं झाडाझडती घेतली आहे. पोलीस कोठडीत असलेल्या शीतलकडून महत्वाची कागदपत्रे हस्तगत करायची आहेत. मूळ कुलमुखत्यार पत्र, मूळ दस्त, तसेच ३०० कोटींपैकी काही रक्कम हस्तगत करायची आहे. त्या अनुषंगाने पुणे पोलीस पिंपरीच्या घरी आले.

शीतल तेजवाणी आणि तिचे पती सागर सूर्यवंशी सध्या पुण्यात वास्तव्यास आहेत. मात्र तिचं माहेर हे पिंपरीतील वैष्णो देवी मंदिराजवळ आहे. शितलने याचं माहेरच्या घरात काही पुरावे दडवून ठेवले असतील, अशी शंका पुणे पोलिसांना आहे.मुंढव्यातील ४० एकर जमीन घोटाळाप्रकरणातील आरोपी शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणात शीतल तेजवानी मुख्य आरोपी असून तिची चौकशी देखील करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी



ही जमीन खरेदी करण्यात आली होती. त्यामध्ये, प्रकरणातील तपासाचा वेग वाढवल्यानंतर पोलिसांनी मुख्य सुत्रधार म्हणून शीतल तेजवाणी याआधी दोन वेळा चौकशी केली होती. चौकशीत उघड झालेल्या बाबींवरून तिचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली. पुणे जमीन घोटाळा प्रकरणातील दाखल झालेला गुन्हा रद्द करण्यासाठी शीतल तेजवानीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर याबाबत सुनावणी देखील झाली. मीडिया रिपोर्ट्समुळं आपणास लक्ष्य केलं जात असल्याचा दावा तेजवानीने याचिकेत केला होता. एफआयआर मीडिया रिपोर्टवर गुन्हा दाखल केला असून मीडियात फरार घोषित करण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. दुसऱ्या जमिनीप्रकरणी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून तेजवानीची उपस्थिती आवश्यक असल्याचा युक्तिवाद देखील वकिलांनी केला होता. मुंढवा जमीन गैरव्यवहाराबद्दल आधी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या बावधन पोलीस ठाण्यात दिग्वीजय पाटील, शीतल मेजवानी आणि रविंद्र तारु यांच्या विरोधात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर, पुणे पोलिसांनी देखील यात उडी घेत नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. आता, शीतल तेजवानीला अटक करण्यात आली आहे.

## मंचर बाजार समितीतर्फे प्रति क्विंटल ५,३५८ रुपये शासकीय हमी बाजारभावाने सोयाबीन खरेदीला सुरुवात

**मंचर । प्रतिनिधी**

चांडोली खुर्द उपबाजार येथे मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने गुरुवारी (ता.४) नाफेड हमीभाव खरेदी केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. बाजार भाव प्रति किलो ५३ रुपये २८ पैसे व प्रतिक्विंटल ५ हजार ३२८ रुपये आहे. या शासकीय हमी बाजारभावाने सोयाबीन खरेदी करण्यात आली. सोयाबीनला वाढीव व स्थिर दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्राचे उद्घाटन शेतकरी अर्जुन धोंडीबा ढमढेरे (रा. पिंपळगाव घोडे) व आंबेगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश थोरातयांच्या हस्ते सोयाबीन पोत्याचे व डिजिटल काट्याचे पूजन करून करण्यात आले. यावेळी उपसभापती सचिन पानसरे, संचालक राजू भंडारी, अरुण बांगर, गणेश वायाळ, लक्ष्मण बाणखेले, पणन मंडळाचे बाळासाहेब देशमुख, नाफेडचे गणेश बांगर, सचिव सचिन बोराडे तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते. चांडोली खुर्द उपबाजारात खरेदी केंद्र सुरू झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, हमीभावामुळे सोयाबीन विक्रीला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. थोरात म्हणाले, ’गत पाच वर्षांत सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. खाजगी व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची बाजारभावात व वजनात होणारी फसवणूक थांबावी यासाठी नाफेड केंद्र मंजुरीसाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. आता शेतकऱ्यांना प्रति क्विंटल पाच हजार ३५८ हमीभाव मिळणार असून खरेदी केंद्रामुळे सुरक्षित व्यवहाराची हमी मिळाली आहे.